# तिसरे प्रकरण

## ‘माणुसकीचा गहिवर’ -रसग्रहण

## 'माणुसकीचा गहिवर'-रसग्रहण

या प्रकरणात 'माणुसकीचा गहिवर' या कथासंग्रहातील कथांचे क्रमवार रसग्रहण केले आहे.

## १. ''शंभू शिखरीचा राजा !''

एका भाविक व श्रध्दाळू शंकर देशपांडे नावाच्या मराठी माणसाची ही कथा आहे. त्यासाठी पार्वतीने घेतलेल्या शरीर क्लेशाची ही गाथा आहे.

### कथानक-

माणदेशातील गोष्ट. गाव सधन. वडिलोपार्जीत असलेली छोटीशी जमीन राखून शंकर आपला प्रपंच करी. घरची झाडलोट, सडासारवण सर्व पार्वती करी. कुठलेच काम करायला दोघेही लाजत नसत. शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवाचा त्यांना आश्रय वाटे. ते त्यांचे कुलदैवत होते. बापाच्या नंतर परंपरागत असलेली शंभू महादेवाची वारी शंकरने सुरू केली. भर अमावस्येच्या रात्री साडे अकरा वाजता तो 'शंभू शिखरीचा राजा' अशी गर्जना करीत देवळात पोहचे. ही यात्रा शंकरने बारा वर्षे चालविली होती.

गावच्या बाहेर एक भले मोठे पिंपळाचे जुनाट झाड होते. त्याचा पार एका निपुत्रिक विधवा बाईने पतीची आठवण म्हणून बांधला होता. जवळच एक महादेवाची पिंड डोक्यावरील नागाच्या दगडी फण्यासह उभी होती. जवळच पाच सात हातावर ज्या स्त्रीने ही पार बांधला तिच्या घरातील गायीची प्रतीमा होती. या तिन्ही गोष्टीत विशेष असे काहीच नव्हते पण गावातील लोकांचे ते गांभीर्य व निष्ठेचे स्थान होते.

गावच्या मागच्या गल्लीत चुना दिलेले एक घर होते. घरातून तबल्याचा आणि गाण्याचा आवाज येई. चाळीशीच्या पुढे गेलेली रंगेल वृत्तीची बाई या घराची मालकीण होती. भोवतालच्या कुणबी माणसांना तिची जरब होती. गावातील लोकांना ती मनाप्रमाणे हुकूम सोडी. शंकरला पाहताच ती दृष्टी पाडून निघून जाई. एक पोरसवदा बाई तिच्या घरात वावरत होती. त्या संबंधी गावात चर्चा सुरू होती. तालुक्याच्या अंमलदाराच्या फेऱ्याही गावाकडे वाढल्या होत्या.

शंकर देशपांडे साधा सरळ माणूस पण बबीजानच्या घरी ही पोर आल्यापासून तो कावराबावरा

झाला. ही चांगल्या घरची पोर फसवून येथे आणली आहे हे कळल्यापासून काय तरी करून त्या तरण्या पोरीला येथून सोडविले पाहिजे हे त्याच्या मनाने घेतले व या नरकात न राहण्याविषयी त्याने तिला कळविले. बबीजानला संशय आला. पोरीवर तिने सक्त नजर ठेवली. एके दिवशी रात्री ती बिनमुर्वतीने बोलू लागताच जमादाराने तिची मान धडावेगळी केली. बबीजानने मुलगी घरातून एकाएकी नाहीशी झाल्याचे कळविले. हवालदार, फौजदार, जमादार, साऱ्यांनी शिवार धुंडाळून काढले. एकाएकी पोलीस शंकरच्या परड्याकडे आले. तो शंकरच्या विहिरीत मुलीचे प्रेत सापडले. पण त्याला शिर नव्हते. लोक शंकरकडे संशयी दृष्टीने पाहू लागले. तीन दिवसात पोलिसांनी शंकरला धरून नेले. देशपांड्यांचा दुर्लौकिक सगळीकडे पसरला. खटला दहा दिवस चालला. शंकरला बारा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. शंकरने जाताना गर्जना केली 'शंभू शिखरीचा राजा.'

दुसरे दिवशी सकाळी पार्वती उठली आणि केरसूणी घेऊन त्या पाराकडे निघाली. पार झाडून तिने तो स्वच्छ धुतला. या पिंपळाला प्रदक्षिणा घालाव्यात, शंभूला नमस्कार करावा. शंकरला ठेवतात तसे आपण रहावे हा तिने निश्चय केला. शिखरावरच्या शंभूचा जप. तुरूंगातल्या शंकराचे स्मरण आणि पिंपळाच्या प्रदक्षिणा हा तिचा क्रम अव्याहतपणे चालू होता.

नवऱ्याचे हाल पाहून तिला वाईट वाटे. दिवसाकाठी नवऱ्याला आठ आठ पायली दळायला लावतात हे कळल्यापासून तिने पीठ खाणे सोडून दिले. तिने आपले अन्न व वस्त्र ही शंकरला तुरूंगात दिल्या जाणाऱ्या वागणूकीप्रमाणे बदलले. सहानुभूती या शब्दाला तिने खरा अर्थ प्राप्त करून दिला. नवऱ्यावरची तिची निष्ठा तिने या पध्दतीने व्यक्त केली.

एके दिवशी जमादार फौजदार मंडळी घरातून बाहेर पडतात तो गावातील घरांच्या भिंतींना जाहीरनामे लागल्याचे त्यांना दिसले. ''सरकारने अन्याय केला आहे, शंकर देशपांडे ह्याने खून केला नाही.''[१] लोकांनी लोकांच्या पध्दतीने सत्याला वाचा फोडली. माणसांना अंत:करणे आहेत याचे ते द्योतक होते. शिपायांनी पहिले जाहिरनामे फाडले. जाहिरनामे पुन्हा लागले. पार्वतीने तपाची तीव्रता वाढविली. पौर्णिमेपासून अन्न वर्ज्य करावे ते अमावस्येपर्यंत. तिला कडकडीत उपास पडू लागला. अमावस्येला तर ती तोंडात पाणीही घालीत नसे. प्रदक्षिणांची व्रत मात्र चालूच होते.

शिखर शिंगणापूरच्या गावात अलिकडे एक नवीनच जंगम येऊ लागला होता. दिसायला नटमोगरा, छानछोकी दिसणारा जंगम बबीजानच्या अड्ड्यातील लाडका बनला. तिथे जमणाऱ्या पोलिसांची व त्याची गट्टी जमली. एके दिवशी भोलागीर घोरत पडलेला असताना जमादार व फौजदाराचे त्या पकडून आणलेल्या पाखरासंबंधीचे बोलणे तो ऐकतो. सकाळी उठून पाहतात तो भोलागीर कोठे नाही. जमादार, फौजदार पुन्हा जेव्हा तपासाला आले तेव्हा त्यांनी बबीजानच्या

घराला गराडा दिला. शिपायांनी बबीला घराबाहेर खेचले. तारवटलेल्या लोकांना हातकड्या घातल्या व घेऊन गेले.

फौजदार, जमादार, हवालदार, बबीजान सारे अटकेत होते. बबीच्या घरी आलेली तरणी पोरगी कुठून आली, कुणाची, ती एकाएकी कशी नाहीशी झाली याचा शोध घेण्यासाठी त्यांनी जरब देण्यास सुरूवात केली. पोलीस सुपरिंटेंडेंटने हंटरचे पाच पाच वाधाडे देऊन त्या मुलीचे शिर व धड कोणी गायब केले याचा तपास लावला. हवालदार व फौजदार सह बबीजान त्यात दोषी होती.

गावात एकच हुल्लड उठली. ''शंकर सुटणार, शंकर सुटणार !'' पण पार्वतीच्या प्रदक्षिणा सुरूच होत्या. शिदू पवाराने दंडवत घालून तिला सांगितले, ''पार्वतीमाय, आता तुम्ही कष्ट करू नका. शंकरदेव सुटले म्हणून समजा. मोठा सायेब लई नामी मानूस हाय.'' हे ऐकताच पार्वतीने प्रदक्षिणा थांबविल्या.

घाणा ओढीत असलेल्या शंकरला तुरूंग अधिकाऱ्याने मुक्त केले. सरकारतर्फे साक्षी झाल्या. सरकारतर्फे साक्षी झाल्या. नाकेल्या भोलागीरने म्हणजेच पोलीसाने साक्ष दिली. न्यायमूर्तींनी सरकारमार्फत शंकरची क्षमा मागितली. शंकर मुक्त झाला.

शंकर पार्वतीचा गाव आनंदाने वेडा झाला. पार्वतीला लोकांनी डोलीत बसवले. शंभूराजाच्या पायाकडे नेले. त्याच्या दुसऱ्या दिवशी चैत्री यात्रेचा उत्सव होता. पार्वतीची पालखी देवळाच्या दारापाशी आधीच येऊन दाखल झाली होती. शंकर पार्वतीची भेट झाली आणि तिकडे त्या अश्वत्थ वृक्षाच्या अंगाला सहस्त्रावधी नवे अंकूर फुटले.

## व्यक्तिचित्रे-

**पार्वती-** हे या कथेतले मुख्य पात्र आहे. लहानखुऱ्या बांध्याची ही स्त्री पतिव्रता आहे. प्रपंचाची खरी काळजी तिला आहे. घरचे सडासारवण ती करी व घर आरशासारखे ठेवी. प्रसंगी कडब्याचा भारा ती डोक्यावरून आणी. ती कष्टाळू आहे.

शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवावर तिची निष्ठा आहे. अमावस्यच्या रात्री शंकर शिखरावर जाऊन परत येताच ती त्याच्या पायांना तेल लावी, पायावर पाणी घालून महादेवाचा अंगारा कपाळी लावी. ती वृत्तीने भाविक आहे.

नवऱ्यावर तिची निष्ठा व प्रेम आहे. तो देवमाणूस आहे. नवऱ्यावर झालेला अन्याय हा आपल्यावरचाही अन्याय आहे असे ती समजते. त्या पोरसवदा मुलीला ठार मारण्याचे कृत्य नवऱ्याने केलेले नाही. हे त्याच्यावरील कुभांड आहे, ही तिची खात्री आहे.

या आरोपावरून नवऱ्याला धरून नेले जाते. बारा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा होते हे कळताच ही पतिनिष्ठ पार्वती पिंपळाला प्रदक्षिणा घालण्याचे व्रत स्वीकारते. नवऱ्याला आठ आठ पायली दळायला लावतात हे कळताच ती पीठ खाण्याचे सोडून देते. कैद्याला वेताच्या फोकाने मारतात हे कळताच ती मऊ अंथरूण वर्ज्य करते. घुगऱ्या उडदाचे घुटे किंवा हुलग्याचे माडगे खाऊन दिवस काढते. जो आपल्या घरादाराचा आणि जीविताचा धनी तो जर राबत, मरत व कण्हत आहे तर या देहाचे सरण झाले तरी चालेल अशी प्रखर धार तिच्या प्रीतीला प्राप्त झाली होती. पतीप्रेमाच्या व शंभूनिष्ठेच्या बळावर ती हे सर्व सुसह्य करीत होती.

लोकांनी शंकरच्या निर्दोषपणाची साक्ष जाहीरनामे चिकटवून दिली. पण त्याचा काहीच परिणाम झाला नाही. पार्वतीने आपले व्रत अधिकच कडक केले. गावातील स्त्रियांना ती कशी वाटली याचे चित्र माट्यांच्याच शब्दात असे आहे, 'गावातील स्त्रियांना पार्वती म्हणजे दैवत बनली, त्या तिला नमस्कार करू लागल्या. तिच्या प्रदक्षिणा चालू असल्या म्हणजे त्या रडवेली तोंडं करून हात जोडून पारापाशी स्तब्ध उभ्या रहात. पुरूषासारखे पुरूष पण ते बायकांसारखे रडू लागत. पार्वती मात्र नखशिखांत गांभीर्य बनली होती. तिच्या हळहळीची भावना झाली होती, भावनेची तपश्चर्या बनली होती, तपश्चर्येचे गंभीर पण दारूण तत्व बनले होते.' [३]

शंकर निर्दोष सुटल्यावर पार्वती व शंकरची भेट लोकांनी उत्सवी स्वरूपात घडविली. या भेटीचे वर्णन माट्यांनी नेमक्या व जबरदस्त भाषाशैलीत केले आहे. 'मग ते मांगल्याचे, पावित्र्याचे आणि त्याच्या गृहस्थाश्रमाचे परमसात्विक निधान त्याने दु:ख आणि आनंद यांच्या भरतीत दोन्ही हातांनी कवटाळले. देवळात जाऊन दोघांनी शिवाला साष्टांग दंडवत घातले.' या वाक्याने संपूर्ण कथेला एक उंची प्राप्त होते. पतीप्रेमास सर्वस्व मानणारे हे व्यक्तिचित्र आहे.

शंकर- हे या कथेतले दुसरे पात्र. शंकर देशपांडे घरचा खाऊन पिऊन सुखी होता. बापाने ठेवलेला कुणगा सांभाळून शंकर आपला प्रपंच बरा तरतुदीने करी. शंकर वृत्तीने कष्टाळू आहे. दररोज शेतावर जाई. येताना गवताचा भारा डोईवरून आणायला तो कधी चुकला नाही. या कुटुंबाला शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवाचा आश्रय वाटे. तेच त्यांचे कुलदैवत होते. घरी असणारी महादेवाची वारी शंकरने बापाच्या पश्चात चालू केली.

गावापासून सहासात कोस असणाऱ्या शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवावर त्याची अढळ निष्ठा आहे. अमावस्येच्या दिवशी दिवे लागणीला शंकर वारीला निघायचा. त्या निर्मनुष्य रस्त्यावर 'शंभू शिखरीचा राजा' अशी गर्जना मध्ये मध्ये तो करीत असे. खांद्यावर पंचा, अंगात पैरण, पायात शेर वजनाचा जोडा आणि हातात एक टिकारणे असा त्याचा वेष असे. साडे अकराच्या सुमारास देवळात पोहचून तो साडेबारास तेथून निघे. निर्भिड शंकरला चोरा चिलटांचे भय नव्हते. अशी ही शिखर शिंगणापूरची यात्रा त्याने बारा वर्षे चालविली होती. गावात प्रतिष्ठित

असणारी ही आसामी निर्व्यसनी होती.

शंकर देशपांडे असा होता-'शंकर देशपांडे बापडा अगदी सीधा माणूस होता. कोणाच्या अध्यात ना मध्यात अशी त्याची वागणूक असे. हा मोठा अब्रुदार माणूस आहे, अशी गावातील सर्व लोकांची खात्री होती. त्याचा उदार स्वभाव, त्याची महादेवावरील निष्ठा आणि लोकांसाठी अंग मोडून काम करण्याची त्याची तत्परता यामुळे गावातील लोकांत शंकर मोठा प्रिय बनला होता. तो सरळमार्गी होता.' [५]

बबीजानच्या घरी आलेल्या पोरसवदा मुलीला त्यांनी फसवून आणली आहे हे कळताच हा सत्प्रवृत्त शंकर कावराबावरा झाला. हस्ते परहस्ते त्याने तिला तेथून निघून जाण्यासाठी निरोप पाठविला. पण शंकरवर कुभांड रचले गेले. त्या मुलीचे शिर वेगळे धड त्याच्या विहिरीत सापडले. शंकर हा सरळ प्रवृत्तीचा माणूस यात बळी गेला. शंकरला शिक्षा झाली. गावातील लोकांनाही आश्चर्याचा धक्का बसला. सरकारने अन्याय केला आहे. शंकर देशपांडे खुनी नाही अशा अर्थाचे लागलेले जाहीरनामे सरळ सरळ आपला कौल शंकरच्या बाजूने स्पष्ट करतात.

भोलागीरच्या रूपात आलेल्या पोलीसाकरवी सत्य बाहेर पडते. शंकर निर्दोष सुटतो. न्यायमूर्तीदेखील सरकारच्या वतीने शंकरची माफी मागतात.

शंकरची निष्ठा पणाला लागते. शंकर सदाचारी, सत्प्रवृत्त, सरळमार्गी आहे. शंकर दोषी नाही हे समजताच गाव आनंदाने वेडा होतो. शंकर व पार्वतीची भेट लोकांनी मोठ्या श्रध्देने व उत्सवी स्वरूपात घडवून आणली. शंकरवरील लोकांची निष्ठा या प्रसंगातून दिसून येते.

**बबीजान-** हे या कथेतील रंगेल वृत्तीचे पात्र आहे. या स्त्रीच्या घरातून तबला गाण्याचा आवाज येई. चाळीशीच्या पुढे गेलेली ही बाई निमगोरी आहे. तिच्या डोळ्यात एक चमत्कारित धुंदी आहे. गावाच्या अश्राप कुणबी माणसांवर तिची जरब आहे. लोकांना ती हुकूम सोडण्याचे काम करते.

वृत्तीने ही स्त्री निर्दय आहे. सज्जन घरच्या मुली पकडून आणून त्यांना ती वाममार्गास लावते. प्रसंग अंगाशी येतो आहे असे दिसताच प्रसंगी ती त्यांचा खून करवते. सरकार दरबारी सुरवातीला तिचे वजन आहे. पण नंतर मात्र प्रसंग उघडकीला येतो तेव्हा तिला तुरूंगात जावे लागते.

**भोलागीर-** हे ही एक पात्र कथेत आहे. तो जंगमाच्या रूपाने येतो. नाकेला नटमोगरा आहे. पण त्याच्या रूपाने पोलीसातला एक माणूस तपासासाठी आला आहे हे कु णालाच उमगत नाही व त्यामुळे मुलीच्या खुनाचा तपास लागतो.

## वातावरण-

इथली माणसे श्रध्दाळू आहेत. शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवावर शंकर व सावित्रीची तर श्रध्दा आहेच पण गावातील लोकांची अढळ श्रध्दा दिसून येते. गावातील लोक चैत्रीचा उत्सव करतात. इतकेच नव्हेतर शंकर व पार्वतीची भेट देखील ते शंभू महादेवाच्या साक्षीनेच घडवतात.

हे लोक सत्प्रवृत्त आहेत. इथल्या माणसांची माणसांवर श्रध्दा आहे. शंकर सत्प्रवृत्त आहे हे लोकांना सांगावे लागत नाही. शंकर दोषी नाही. सरकारने अन्याय केला आहे. अशा अर्थाचे जाहीरनामे त्याखेरीज लागत नाहीत.

पार्वतीचे भल्या पहाटे उठणे, सकाळी देवाची पूजा, पाराकडे गायीची, पिंडीची पूजा, मध्येच शंभू शिखरीचा राजा म्हणून केलेली गर्जना, शंकरचे अमावस्येच्या रात्री शंभू महादेवाचे दर्शन घेण्यास जाणे यावरून या कथेतील धार्मिक वातावरणाची आपणास कल्पना येते.

दुसऱ्या बाजूला बबीजानच्या घरातले रंगेल वातावरण. एक सज्जन घरातील मुलगी पळवून आणून तिला ठार मारण्यापर्यंत तिची मजल जाते. त्यात जमादार व फौजदारही सामील आहे. या सर्व विलासी रंगेल वातावरणाचा परिणाम मात्र वाचक मनावर होत नाही.

## भाषाशैली-

माडगूळकरांची भाषाशैली कथानकाला साजेशी आहे. हे वातावरण जसे ग्रामीण आहे तसेच दुसऱ्या बाजूला धार्मिक आहे. १९३०-४० सालातील शिखरशिंगणापूरचा भाग आपल्या लेखणीतून माडगूळकरांनी समर्थपणे उभा केला आहे.

गावाबाहेर असलेले पिंपळाचे झाड, विधवा बाईने बांधलेला पार, जवळच असलेली शाळूंका, डोक्यावरील नागाची फणा हे माडगूळकरांनी केलेले वर्णन दृकप्रत्यय देणारे आहे. ही चित्रदर्शी शैली आहे. 'कित्येक सहस्त्र वर्षे पर्यंत हा प्रचंड वनस्पती जगाच्या घडामोडींकडे पहात स्वस्थ चित्ताने उभा होता. याचा देह जरी पोसलेला आणि कांतिमान दिसला तरी त्याच्या पायाला इसब झालेले होत. तेथल्या जीर्ण त्वचेचे काळसर ढलपे मधूनमधून पडत आणि त्याच्या खतात कसली तरी गवते उगवत आणि उन्हाने मरून जात. मुंगळ्यांचे थवेच्या थवे त्याच्या बुंध्याभोवती हिंडत असत.' [६] यातून माडगूळकरांचे सूक्ष्म निरीक्षण दिसून येते.

'वाणी उदमी, बाया बापड्या, पोरे सोरे चटसारे जमा झाले' अशी प्रासात्मक वाक्य रचनाही माडगूळकरांनी या कथेत केली आहे. 'पार्वती घरात होती. ती भयाने सर्द झाली. शंकर शेतावर गेला होता' [७] अशी लहान लहान वाक्ये हे माडगूळकरांच्या लेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य.

शंकरच्या सुटकेची वार्ता कशी आली? 'साताऱ्यातून निघालेली ही शुभवार्ता कृष्णा, वेण्णा, वेरळा, माण या नद्या ओलांडून, मधले विस्तीर्ण माळ मागे टाकून, वर्धनगडासारखे किल्ल्यांना डावे घालून, घोंगावत शंभूमहादेवाच्या रोखाने झेपावत चालली. शंकर पार्वतीचा गाव आनंदाने वेडा झाला'. आपापले धंदे सोडून सारे लोक पारापाशी जमा झाले. शिणली भागली पार्वती आनंदाने शून्यवत झाली. गणू हलत्रायाच्या बायकोने तिच्या डोक्यावर बत्ताश्यांचा वर्षाव केला, शेकडो लोकांनी नारळ फोडले, बुक्का उधळला, टाळ्या वाजवल्या.' [८] माट्यांची ही वातावरण जिवंत करण्याची शैली आकर्षक आहे.

सुष्ट व दुष्ट प्रवृत्तीमधील झगड्याची ही कथा. शंकर पार्वती व बबीजान ही त्याची प्रतीके आहेत. समाजात सदैव यांचा झगडा चाललेला असतो. सत्प्रवृत्त व्यक्तीला काही वेळा हाल, अपेष्टा झगडा सोसावा लागतो. अंतिम विजय मात्र सत्याचाच होतो हे या कथेतून ध्वनित होते.

## २.रामभरोसी पुन्हा धन्याच्या दारात !

अत्यंत प्रामाणिकपणे नोकरी करणाऱ्या रामभरोसी नावाच्या इमानदार पहारेकरी माणसाची ही कथा आहे.

### कथानक-

रामभरोसी वयस्क झाला होता. पण तो मनाने अस्वस्थ होता. एका पारशी माणसाच्या बंगल्यावर तो नोकर होता. मालकाच्या श्रीमंतीचा आपल्याला काय उपयोग असे त्याला वारंवार वाटे. वर्षानुवर्षे सेवा चाकरी करून म्हातारपणी आपल्याला मालक घालवून देणार असे त्याला वाटते. पगार मिळाला ना? एवढीच मालक त्याची चौकशी करतो.

याचा मालक पारशी आहे. पुण्याबाहेर एका इतिहासप्रसिध्द रस्त्यावर याचा बंगला आहे. बंगल्याभोवती मोठा विस्तृत बगीचा आहे. देशोदेशींच्या उत्तम वेलींची रोपटी उपवनात जिकडे तिकडे लावलेली आहेत. येणारे जाणारे लोक सुध्दा थांबून ही शोभा पाहतात. एकंदरीत मालक हौशी आहे.

बंगल्याची रोषणाई श्रीमंतीला साजेशी आहे. सर्वत्र टापटीप व स्वच्छता आहे. नोकरांसाठी बांधलेल्या खोल्या देखील प्रशस्त व हवेशीर होतील याकडे लक्ष दिले आहे. एकूण सावकाराचा बंगला म्हणजे शांतीसदन आहे. बंगल्यातले सेवक वक्तशीर आहेत. मालकाला मनोमन आशीर्वाद देतात. बंगल्यात स्वास्थ्य, समाधान व शांती यांचे साम्राज्य आहे.

पण रामभरोसी मात्र कष्टी होता. इतर सेवकांप्रमाणे तो देखील आपल्या कामात दक्ष असे. भरोसी सकाळी लवकर उठून स्नानसंध्या आटोपून कांडेदार दांडा खांद्यावर टाकून कामावर हजर होत असे.

हा उमदा माणूस घर सोडून आला होता. दोन महिन्यांनी येणारे घरचे पत्र त्याची बेचैनी वाढवी. पण शरीरकष्टावाचून त्याला काही करता येण्यासारखे नव्हते. घरी बसून रहावे तर प्रपंचाची काळजी त्याच्या समोर होती. मालकाकडून मिळणाऱ्या तीस रूपयांपैकी पाच रूपयात तो स्वत:चे पोट भागवी. राहिलेले पैसे घरी पाठवी. असे करता करताच सावकाराचे कर्ज फिटेल व आपण चार पैसे गाठीस मारून आपल्या देशाला जाऊ असे तो मनात म्हणत असे.

भरोसी महिनाभर घरी जाई. जाऊन मुलाबाळात राही. घरी पाठवित असलेले रामभरोसीचे सर्व पैसे खाण्यावरच खर्च होत. मोठ्या मुलाकडून भरोसीला कर्जव्याजाचा हिशेब मिळत असे. आपण एवढा पैसा पाठवतो पण तो खाण्यावरच खर्च होतो. सावकाराचे कर्ज मात्र वाढत चालले आहे. त्यावरील व्याजाच्या्या डोंगराची काळजी त्याला सतावत असे.

मुलांबाळांकडे सुनेकडे पाहून त्याला हर्ष होई. पण वर्षात आपल्या पत्नीला आनंदाचा एकच महिना मिळतो याचा त्याला विषाद वाटे. सावकाराकडे जाऊन व्याजाची चौकशी करून समजूत घालून कष्टी मनाने भरोसी पुण्याला येई तो उदास मनानेच !

एक दिवस भरोसीच्या मनात आले बायकोला आपण इकडे आणावे. दोन महिने घरी पैसे न धाडता प्रापंचिक हौस म्हणून काही चिजा रामभरोसीने खरेदी केल्या. मोठा व मधला मुलगा दोघेही काही हातपाय हालवू लागले होते. त्यांच्या मिळकतीवर कसेबसे चालेल आणि आता मुलांचे मुलांनी पहावे असाही एक विचार त्याच्या मनात येऊन गेला. आपल्या धाकट्या मुलाला घेऊन रूपरेखा, भरोसी बंगल्यावरील कोठडीत राहू लागले. पतीचे सानिध्य भोवतालचे, मनोरम वातावरण, मोकळी हवा यात ती रमली. पण दारात मालक येताच फाटक उघडून साहेबाला सलाम ठोकणे व द्वारपालाच्या घरकुलात उभा राहणे ही वागणूक तिला अपमानास्पद वाटे. कोणीही माणूस फाटकापाशी आला की त्याला कोण हवे नको ते विचारायचे. साहेब, तानीबाई, रतनबाई इतकेच काय पण लहान सहान मुलेबाळे आली तरी खटकन ताट होऊन सलाम करावा लागे आणि एखाद्या झांब्या कुत्र्यासारखे दारावर उभे रहावे लागे. भरोसीने मुले माणसे आणली आहेत हे समजताच न सांगता मालकाने त्याला दहा रूपये जास्त द्यायला सुरूवात केली.

पाऊस नाही. शेतात पसाभर धान्य नाही. तुम्ही स्वत:च शेतीची विल्हेवाट लावा अशा अर्थाची मुलांची पत्रे भरोसीला येऊ लागली. थोरला मुलगा गंगाप्रसादने सावकाराकडे साऱ्या जमिनी गहाण टाकल्या. व्याज भागले पण कुळच्या कर्जात भरच पडली. जमिनी सोडवा नाही

तर खरेदी द्या अशी परिस्थिती येऊन जमिनी सावकाराच्या घशात जाणार हे चित्र भरोसीला दिसू लागले आणि तसेच झाले. जण जमिनींचा विचार करण्यापेक्षा त्याने पोरांच्या चित्ताचा विचार केला व देवावर हवाला ठेवला.

भरोसी दु:खाने बेहोष बनला. नवकोट नारायणाची सेवा करूनही मी भिकारीच राहिलो. भिकच मागायची तर पोराबाळात जाऊन तरी मागावी. या विचाराने त्याने नोकरी सोडण्याचा विचार मालकापुढे बोलून दाखविला. पण इमानी नोकराला सोडायला मालकही तयार होईना. आणखी चार महिन्यांनी वाट पाहून भरोसी नोकरी सोडून गडीमाणसांना राम राम करून परतला.

दरम्यान पारशाने रामभरोसीची सर्व चौकशी करून सावकाराचे देणे फेडले, व्याजासकट सगळ्या रकमा परत केल्या. बैल, आऊते, बी घेण्यासाठी व विहिर पाडण्यासाठी दहा सहस्राची रक्कम धाडली. भरोसीच्या स्वागताला सर्व जण साज शृंगार करून उभी राहिली. भरोसीने सारी हकीकत कान भरून ऐकली.

पण भरोसीला चैन पडेना. त्याच्या अंगात माणूसकी जागृत झाली. पुन्हा भरोसी मरेपर्यंत बंगल्याच्या दारात रखवालदार म्हणून राहण्यासाठी पुण्याला परत आला.

## व्यक्तिचित्रे-

रामभरोसी- हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. रामभरोसी भोवतीच सर्व कथा फिरते. रामभरोसी कसा आहे याचे वर्णन माट्यांच्याच शब्दात पहा. 'त्याच्या पिकलेल्या कल्ल्यांना हनुवटीवर भांग पडलेला होता, आणि त्याची निमुळती होत गेलेली टोके कानांच्या चोब्यांपर्यंत पोहचलेली होती. भरोसीच्या भुवयासुध्दा पिकल्या होत्या. पांढऱ्या म्हणता म्हणता पिंगट बनत चाललेल्या त्याच्या मिशा म्हणजे भरोसीचे खरे खरे ऐश्वर्य होते, आणि त्याचे त्यालाही हे वैभव भोगावेसे वाटे. सगळ्याच पुरभय्यांप्रमाणे रामभरोसीने आपल्या मळक्या धोतराचा गुडघ्याइतका काचा मारला होता. त्याच्या अंगात एक पांढुरकी पैरण होती; आणि डोईचे पागोटे त्याने काखेत दाबून धरले होते.' [१]

रामभरोसी वृत्तीने भाविक आहे. रामावर त्याची श्रध्दा आहे. तुलसी रामायणातले दोहे त्याला पाठ आहेत. सकाळी लवकर उठून खोलीतल्या रामाची पूजा करून स्नानसंध्या करणे हा त्याचा नित्यनेम आहे.

वयाच्या चाळीशीपासून तो धन्याच्या घरात देवडीवाल्याचे काम करी. पण गावात त्याची गणना प्रतिष्ठीत माणसात होत असे. महिन्याला तीस रूपये मिळविणारा हा गृहस्थ मनाने अस्वस्थ आहे. पण तो चेहऱ्यावरून कधी दाखवून देत नसे.

घरच्या गरिबीमुळे त्याला साधी प्रापंचिक हौस देखील ठराविक वयात पूर्ण करता येत नाही. मुले करती सवरती झाल्यावर तो प्रापंचिक हौस पूर्ण करून घेतो. नव्याने संसार थाटतो.

सावकाराकडे जमिनी गहाण पडल्या. घरातल्या खिन्न वातावरणाचे पत्र रामभरोसीला येते. पण वृत्तीनेच समाधानी, शांत असणाऱ्या रामभरोसीच्या पोराच्या चित्ताचा दाह जाळू लागतो. त्याची रामावर अतूट अशी श्रध्दा आहे. तो मुलाला पत्र लिहितो, ''तू धीर सोडू नकोस. अयोध्येचा राजा रामचंद्र तुझ्या साह्याला आज ना उद्या येईल. आपण काही पाप केलेले नाही. कुणाला फसविलेले नाही, देव आमचा सारथी होईल.'' [१०] देवावरची त्याची अढळ श्रध्दा या ठिकाणी दिसते.

रामभरोसीचा मालक त्याची काही प्रत्यक्ष चौकशी न करता कर्जाची चिंता दूर करतो. रामभरोसीच्या अंगी कृतज्ञतेचा भाव जागृत होतो. माणुसकी जागृत होते व तो मरेपर्यंत त्यांच्या रखवालदार म्हणूनच राहतो.

भाविक, श्रध्दाळू वृत्तीचा, स्वामिनिष्ठ असा रामभरोसी हा या कथेचा नायक आहे.

**रूपरेखा**- रामभरोसीची बायको ही दुसरी व्यक्तिरेखा ! अगदी सर्वसामान्य असणारी ही स्त्री निमगोरी, तजेलदार आणि दिसायला रेखीव शरीराने स्थूल आहे. रामभरोसीचे रूपरेखेवर व रूपरेखेचे रामभरोसीवर भारी प्रेम आहे.

पती घरात येताच धुवून ठेवलेले नवीन लेहेंगे परिधान करणे, चांदीच्या बाळ्या कानात घालणे, डोळ्यात सुरमा घालणे असा पारंपारिक पण साधा शृंगार ती करीत असे. पण नवऱ्याच्या परिस्थितीची फारशी जाण तिला नाही. नवऱ्याला आवडते 'लड्डू' करून आनंदाने व आग्रहाने वाढण्यात तिला समाधान होते. आपल्या नवऱ्याने देवडीवाल्याची नोकरी करू नये असे तिला वाटते. दारावर कुणीही येताच लहान थोर न बघता नवऱ्याने सलाम करायचा हे तिला अपमानास्पद वाटे. रूपरेखला नवऱ्याच्या मानापमाची किंमत आणि भरोसीला स्वास्थ्याची किंमत ! अशी ही एक सर्व सामान्य स्त्री आहे.

**धनी**- हे या कथेत फारसे न बोलता वावरणारे पात्र आहे. पण कृतीशील आहे. जातीने हा गृहस्थ पारशी आहे. पुण्याच्या इतिहासप्रसिध्द रस्त्यावर त्याचा बंगला आहे. भोवती सुंदर बगीचा, बगीचात उत्तमोत्तम फुले व वेली जाणिवपूर्वक आणून लावल्या आहेत. नोकर चाकरांची राहण्याची व्यवस्था देखील हवेशीर व देखण्या खोल्यांत केली आहे. एकूण सारे आवार शांतिसदन आहे.

अगदी व्यवहाराखेरीज कोणतीही चौकशी न करणारा अशी रामभरोसीची त्याच्याबद्दल भावना असली तरी त्याने माणूसपण सोडलेली नाही. रामभरोसी इमानी आहे. याबद्दल धन्याच्या

मनात तिळमात्र शंका नाही. रामभरोसी बायकोला घेऊन पुण्याला आला आहे हे कळताच न मागताच त्याच्या पगारात धन्याकडून दहा रू. वाढविले जातात.

"भरोसी ! तुम्ही तर चांगले बळकट दिसता. काम न व्हायला काय झाले ? अशी गडबड करू नका. तुम्ही इमानी नोकर गेलात म्हणजे आमचे कसे चालणार?" १० या धन्याच्या उद्गारावरून तो माणसातले माणूसपण ओळखणारा आहे हे दिसते.

भरोसी घरच्या कर्जामुळे व हलाखीच्या परिस्थितीने बेहोष बनतो. नोकरी सोडून घरी जायचे ठरवतो. जायला निघतो. त्याची इतकी दीर्घ सेवा जाणून आपल्या प्रामाणिक सेवकाचे सर्व कर्ज फेडण्यासाठी धनी मदत करतो. त्याच्या कृपेने सावकाराचे सर्व देणे फिटते. व्याजासकट सर्व रकमा परत दिल्या जातात. बैल, आडते, बी घेण्यासाठी, विहीरी पाडण्यासाठी दहा सहस्त्र एवढी रक्कम त्याला धन्याकडून मिळते. श्रीमंत निर्दय असतात हे तो खोटे ठरवतो. रामभरोसीच्या संसाराची काळजी करतो. या कथेतला धनी हा माणुसकी जाणणारा म्हणून लक्षात राहतो.

या खेरीज गंगाप्रसाद, माधवप्रसाद ही अनुषंगाने येणारी कमी महत्वाची पात्रे आहेत.

## वातावरण-

कथेत दोन प्रकारचे वातारवरण आहे. एक धन्याचा श्रीमंती थाट, त्याची डौलदार हवेली, विस्तीर्ण असा बगीचा,नोकरचाकर, बंगल्याची रोषणाई, नोकरचाकरांसाठी सुध्दा त्याने केलेली राहण्याची व्यवस्था हे वातावरण एका बाजूला आहे.

तर त्याच्याच नोकराचा गरिबीचा संसार, खिन्न असणारा भरोसी, त्याचे कर्जबाजारीपण, त्याच्या सावकाराकडे गहाण पडणाऱ्या जमिनी व शेत्रटी त्याने नोकरी सोडून भिक मागत का असेना पण मुलाबाळात राहण्याचा केलेला निश्चय, त्याच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकतो.

ही दोन अगदी विरूध्द टोकाची चित्रणे या कथेत माट्यांनी केली आहेत. पण माणूसपण हा दोहोंमध्ये समान गुण आहे. ही दोन्ही चित्रणे बरोबर एका ठिकाणी सांधली आहेत ती रामभरोसीला धन्याने न सांगता केलेल्या मदतीच्या प्रसंगाने माणुसकीच्या समान भूमिकेवर दोघेही एकत्र येतात. त्यामुळे कथा परिमाणकारक बनते.

## संवाद व भाषाशैली-

सावकाराच्या हवेलीचे, तसेच बंगल्याचे केलेले वर्णन व वापरलेली भाषाशैली अप्रतीम आहे. संवाद व निवेदन दोन्ही नागर भाषेत आहेत.

धनी भरोसीला न विचारता, चौकशी करता त्याची सर्व देणी परस्पर भागवतो. भरोसीचे हे

समाधानाचे उद्गार त्याची साक्ष आहेत.

''एखादे पर्वताचे शिखर नाहीतर अश्वत्थवृक्ष रडावा तसा भरोसी ढसढसून रडू लागला. त्याचे अश्रु चिलियाच्या गालांवर पडले. ''माझ्या धन्याने हे केले?'''होय पिताजी !'''सावकाराचे सारे देणे फिटले?'' ''व्याजासकट सगळ्या रकमा आल्या'' सावकार म्हणाले. ''आपल्या वडिलांच्या जमिनी आपल्याकडे परत आल्या?'' ''होय'' म्हणून प्रसादने शेतावरची बरोबर आणलेली मृतिका त्याच्या शेल्याच्या टोकात बांधली ! ''धन्य धन्य धनी साहेब ! धन्य ! तुम्हाला मी अभद्र बाललो ! माझा आवाज पुण्याला पोचेल का ?'' [११]

ही कथा मध्ये मध्ये खूपच पसरट झाली आहे. हे तिचे परिणामाच्या दृष्टीने उणेपण जाणवते.

## ३. नासलेले अमृत मधुर झाले !

इंद्रलोकी नासलेले अमृत मृत्यूलोकीच्या चोखोबाने हरिनामाच्या गजराने मधुर केले त्याची ही कल्पनारम्य कथा.

### कथानक:-

इंद्राच्या वाड्यात जेवायला जमलेल्या पुण्यात्म्यात कुजबुज सुरू होती. तोंडातून शब्द काढावा तर इंद्राचा अपमान होईल. अमृताला वास येत होता. दुसरे काही खावे तर पंगतीत अमृताखेरीज काही मिळत नसे. अमृतात षड्रसपूर्ण पक्वानांची चव होती. सारे काही होते. पुण्य कमी झाल्यावर जे मृत्यूलोकी जात त्यांच्या जागी नवा पुण्यात्मा येई. इंद्रलोकीची पंगत त्यामुळे गजबजलेली राही. पण आज मनापासून कोणीच जेवताना दिसेनात. रंगीबेरंगी नेसणी नेसलेल्या इंद्राने उत्तर दिले की आज अमृताला वास येत आहे. इंद्राच्या परींनीही हेच उत्तर दिले. इंद्र मनात गडबडला. पंगतीत दुसऱ्या टोकाला असलेल्या इंद्राणीलाही हे कळले होते. इंद्राने ते चाखून पाहिले. चव कळताच थुंकून टाकले. इंद्राने सर्व पुण्यात्म्यांनाही ते खाऊ नका असे सांगितले. कारण त्यांना ते वाढणे म्हणजे पातक होते.

अमरपुरी हे आपल्या नगरीचे नाव आता खोटे ठरणार हे पाहून इंद्राला चैन पडेना. आपल्या अमरपुरीचे काय होणार? याचा विचार तो करू लागला. इंद्रासकट सर्व जण गांगरले. पण इंद्राणीने धीर सोडला नव्हता. बरेच दिवसात न आलेले नारद येतील. ते काय म्हणतात ते पाहू असा सल्ला इंद्राणीने दिला. अखंड भगवंताचे नामस्मरण करीत नारदाची स्वारी इंद्रलोकी अवतरली. इंद्र इंद्राणीने नारदाचे यथोचित स्वागत केले. उभयतांनी अमृत नासल्याचा वृत्तांत सांगितला. यावर नारदाने त्यांना उपाय सांगितला.

नारदाने त्यांना मृत्यूलोकीची कथा सांगितली. भिवरेच्या काठी पंढरीक्षेत्र आहे. प्रत्यक्ष देव पुंडलिकाच्या दारात उभा आहे. संतांच्या किर्तनात तो नाचतो. ती कैवल्याची पेठ आहे. तेथे तुम्ही गेलात तर अमृत शुध्द होईल. हे नारदाचे कथन ऐकून मृत्यूलोकी जाऊन अमृत शुध्द करून आणावे ही गोष्ट इंद्राला अपमानास्पद वाटली. पण अमृत तर शुध्द केले पाहिजे. म्हणून अखेर इंद्राने भूलोकी जायचे ठरविले.

इंद्र आपले हंसासारखे शुभ्र विमान घेऊन पंढरीला आले. एकादशी होती. सोमवार होता. कमरेला सुंभाचा करगोटा, रकट्याची लंगोटी, हातात दगडाचे टाळ अशा अवस्थेत नामा पंढरीच्या वाळवंटात किर्तन करत होता. अमरलोकीचे देव केव्हा केव्हा सभेला का येत नाहीत हे इंद्राला आज कळले. नामदेव किर्तनात दंग झाला होता. किर्तनाला जसा इंद्र बसला होता, तसाच लावण्याचा गाभा श्रीहरी देखील बसला होता.

चोखामेळा आपल्या घरीच होता. एकादशी होती. दोघेही भजन करीत बसली होती. तीन प्रहराच्या जागरणानंतर देव आपल्या घरी पारण्याला येणार असल्याचे चोखोबाने सोयराबाईला सांगितले. सोयराबाई स्वयंपाकाला लागली. चोखोबाने करूण स्वराने भजन सुरू केले. चंद्रभागेच्या तीरावर किर्तनात दंग असलेल्या देवांच्या कानी ते करूणवचन पडले. नाम्याला त्यांनी चोख्याच्या घरच्या निमंत्रणाची आठवण करून दिली. गंधर्वगण, नारद, देव, नामा सर्वांबरोबर इंद्रही निघाला. नारदाने चोखोबाकडे अगोदर जाऊन वार्ता कळविली. देवाबरोबर आज गंधर्व, सुरवर व प्रत्यक्ष इंद्रही असल्याचे त्याने सांगितले. आपल्या दरदर पाण्यात रांधलेल्या कण्या विठ्ठलाला चालतील पण इंद्रादिकांचे काय करावे असे वाटून त्याची तारांबळ उडाली. देवच जेथे पंगतीला तेथे ऋध्दिसिध्दी प्राप्त झाल्या. पक्वानांचा घमघमाट सुटला. सोन्याचांदीच्या ताटवाट्यांची चकमक उडू लागली. जगाच्या आरंभस्थानच्या या मेहूणाला चोख्याने लोटांगण घातले.

चोख्याच्या अंगणात पंगती बसल्या. पदर खोचून सोयराबाई वाढत होती. अमृताचा कुंभ इंद्रांनी देवापुढे ठेवला. इंद्राने देवाला सांगितले की अमृत नासल्याने अमरपुरीचे सारेच वैभव लयाला गेले आहे. आपल्या पवित्र स्पर्शाने आपण ते पावन करावे. इंद्राच्या आगमनाचे कारण सर्वांना कळले. आता काय होईल याची उत्कंठा सर्वांना लागली. देवांनी चोख्याला पाचारण केले. आपल्या प्रिय भक्ताला त्यांनी ते अमृत शुध्द करण्यास सांगितले. भक्ताने शुध्द केले तर देवांनी शुध्द केल्यासारखे होणार हा भक्ताचा श्रेष्ठपणा होय. यावर चोखा म्हणाला, ''माझ्या नारायणा, तुझ्या नामापुढे या अमृताची काय रे मातब्बरी आहे ? शुध्द केले तरी ते काय तुझ्या नामामृतापेक्षा जास्त चव देईल ? पण तू म्हणतोस म्हणून शुध्द करतो.'' [१२] चोख्याने त्या नासलेल्या अमृताकडे हरिनामाचा गजर करीत टक लावून पाहिले. अमृताचेच चित्त हेलावून ते मूळ प्रकृतीवर आले, ते पहिल्यासारखे शुध्द झाले.

## रसग्रहण-

इंद्र, इंद्राणी, विठ्ठल, रूक्मिणी, नारद या सर्व देवांना, देवलोकीच्या व्यक्तींना लौकिकातील मानव स्वरूपात कल्पून ही कथा साकारली आहे. ह्याला एक आध्यात्मिक प्रवचनाचे स्वरूप यावे अशा सर्व घटना यात घडतात. काही ठिकाणी अद्भुताचा आधार घेतला आहे. अमृत मधुर होते तेही एका अस्पृश्य संताच्या दृष्टीने हे प्रकर्षाने माट्यांना या ठिकाणी दाखवायचे आहे. या ठिकाणी माट्यांची भाषा अलंकारांनी नटली आहे. इंद्र लोकाला साजेसे वर्णन या ठिकाणी येते. या लोकीच्या पऱ्या 'कस्तुरीची चोपून केलेली जमिन नखांनी खरडीत साळुंखीच्या आवाजाने बोलतात. तर अमृत प्राशनाचा पेला आकाशातील बारीकसे नक्षत्र नारळासारखे खोवून त्वष्ट्याने तयार केला आहे. इंद्र सूर्यकिरणांच्या बनविलेल्या पळीने अमृत प्राशन करतो. तर नामा रकट्याची लंगोटी लावून, दगडाचे टाळ हातात घेऊन किर्तन करतो. भाषा अलंकारिक आहे. तशीच साधीपण आहे. माट्यांच्या प्रतिभेला ही कल्पकता श्रेष्ठ दर्जाची व अव्वल आहे.

ही एक काल्पनिक कथा देवलोकीचे नासलेले अमृत हरिनामाच्या गजराने शुध्द होते . हा या कथेचा गाभा. हरिनाम संकीर्तन हे भक्तीचे सोपे माध्यम. त्या हरिनाम संकीर्तनाची थोरवी इथे चित्रित केली आहे. प्रत्यक्ष अमरपुरीतील इंद्रालाही नासलेले अमृत शुध्द करून घेण्यासाठी प्रत्यक्ष पृथ्वीवर येऊन पंढरपूरच्या विठ्ठलाला विनंती करवी लागते. विठ्ठल नामाच्या गजरातील हे सामर्थ्य अलौकिक आहे. नासलेले अमृत शुध्द करण्याची शक्ती चोखोबाच्या दृष्टीत व हरिनामच्या घोषात आहे ही कल्पना असाधारण आहे. संत हे मराठी संस्कृतीचे शिल्पकार आहेत . संतांच्या व्यक्तित्वात आणि विचारात समाजमनाची मशागत करण्याचे फार मोठे सामर्थ्य आहे.

या कथेतील इंद्र, इंद्राणी, नारद, नामदेव, चोखोबा ही पात्रे जिवंत झाली आहेत. ''अमृत जरी झाले तरी ते तुझ्या नामाची चव देईल काय?'' हा चोखोबांचा विचार अत्यंत मार्मिक व सूचक आहे. वास्तव आणि अद्‌भूतरम्य वातावरणाचा गोफ इथे गुंफला आहे. संत महंतांच्या व्यक्तित्वावरील व विचारधनावरील श्रध्दा हा माट्यांच्या व्यक्तिमत्वातील महत्वाचा पैलू इथे साकार होताना दिसतो.

## ४.माझे दहन तुम्ही करा !

तायडी नावाच्या एका बंडखोर स्त्रीची ही कथा आहे. श्री.म.माट्यांचा समाजसुधारणा विषयक दृष्टीकोन या कथेतून प्रतीत होतो.

कथानक-

'शहरात एक प्रसुतिगृह ब्राह्मणवस्तीत सुरू करावे. त्या संस्थेला मी दहा हजार रूपये देईन. पैसे कमी पडले तर आणखी देईन. पण त्याचा उपयोग ब्राह्मण स्त्रियांसाठीच करावा' असा मजकूर लिहिलेला लखोटा शहरातील नगरपालिकेच्या अध्यक्षांच्या हाती पडला. पण या कोड्याचा उलगडा त्यांना होईना.

कोकणातील एका तालुक्याच्या गावी नारोपंत म्हणून गृहस्थ रहात. नारळ काजूचा व्यापार करून, खाऊन पिऊन पंचावन्न वर्षाचे हे गृहस्थ सुखी होते. आल्या अतिथीचे स्वागत त्यांचे घरी मनापासून होई. नानांच्या सच्चाईवर सर्वांचा विश्वास होता. स्वच्छतेची, फुलझाडांची आवड, कोणाशी भांडण तंटा नाही, कसलेही व्यसन नसलेला हा माणूस होता. नित्यकर्म, देवपूजा करून नाना घराच्या बाहेर पडत त्यांची मुलेही शाळेत हुशार म्हणून नाणावलेली होती.

नानांच्या गावात पंधरा वीस पारशी समाजाची घरे होती. नानांच्या मालाची नेआण ते करीत. दादीशेट हे त्या पारशी समाजातील एक. नानांशी त्यांचा घरोबा होता. दादीशेट गृहस्थ मोठा प्रेमळ माणूस होता.

तायडी ही नानांची मधली मुलगी. पंधरा सोळा वर्षाचा असतानाच तायडीचा नवरा सर्पदंश होऊन गतप्राण झाला होता. तायडी बालविधवा झाली. यमू ही तायडीची मोठी बहीण. ती जेव्हा माहेरी येई तेव्हा सर्व भावंडे तिच्या भोवती गोळा होत. तायडी कधी स्वभावधर्मानुसार अल्लडपणे त्यांच्यात मिसळली तर नर्मदाबाई तिला रागे भरीत. नानांचे धोरण मात्र थोडे सैल होते.

धनजीशेट वयाने विशीतलेच गृहस्थ होते. मुंबईच्या इंग्रजी कॉलेजमधून बी.ए. झालेला हा मुलगा इंग्रजी बोलण्यात सरावलेला होता. दादीशेट व धनजीशेट दोघेही भाऊ. धनजीशेट दादीशेटपेक्षा मोठा धडाडीचा होता, विनयशील होता. धनजीच्या व्यापारात नानांनी भागीदारी ठेवली. भागीदारीमुळे नानांच्या घरी धनजीचे येणे जाणे वाढले. नाना नसतानाही घरी बसून धनजी कागदपत्रे पहात असे. नर्मदाबाई हसून केव्हातरी त्यांच्या विवाहासंबंधी चौकशी करीत. हे संवाद केव्हातरी तायडीच्यादेखील कानावर पडत. नानांनी तायडीला पोथ्यापुस्तके, वृत्तपत्रे समजण्याइतपत लिहिण्यावाचण्याचे शिक्षण दिले होते. पण नर्मदाबाईंना त्याचीच जास्त भीती वाटत होती.

तायडी एक दिवस घरातून एकाएकी नाहीशी झाली. कार्टीने आम्हाला तोंड दाखवायला जागा ठेवली नाही असे नर्मदाबाई म्हणू लागल्या. नाना विचारी गृहस्थ होते. शरीरधर्म सर्वांना असतात. तायडी इतकी काही वाईट नाही. इंद्रिय दमन सर्वांना जमेल असे नाही, अशी त्यांनी

स्वत:ची व नर्मदाबाईंची समजूत काढून घेतली. पण चाचौघात नानांना सामाजिक अवमान हा सोसावा लागलाच. पुरूषोत्तमचा चुलता जेव्हा नानांना भेटायला येतो तेव्हा सुध्दा त्याला नाना काहीच सांगत नाहीत.

धनजी सत्शील गृहस्थ होता. तायडी बेताल अथवा उच्छृंखल नव्हती. नानांनी आतापर्यंत दाखविलेले सौजन्य, स्वत:ची व्यवसायातील पत याचा विसर त्याने पडू दिला नाही. आपल्यामुळे आईला दु:ख झाले याचे तिला वाईट वाटे. दोघे परस्परांशी निष्ठेने वागत. झाल्या प्रकाराने धनजीच्या धंद्याला ठोकर बसली. पण धनजीसारख्या माणसाने परत चांगला जम बसविला. धनजी व तायडी यांचा मनस्ताप कमी झाला. धनजीसारख्या निष्ठावंत माणसावर तिची प्रीती बसली. दोघांनी सामाजिक बहिष्कार खुषीने पत्करला. त्याकाळी अशा लग्नाची काहीच व्यवस्था नसल्याने बहिष्कृत जीवित कंठणे त्यांना प्राप्त होते.

दोघेही उभयता मूलत: वाईट नव्हती. धनजी व्यापार धंद्यानिमित्त बाहेर गेला तरी पारशांच्या अग्यारीत जाऊन येई. अधून मधून धर्म पुस्तकांचे वाचन करी. तायडीही रामायण, महाभारत व साधुसंतांची चरित्रे वाची. तुळशीची पूजा केल्याशिवाय अन्नग्रहण करीत नसे. तायडीवर धनजीचे जीवापलीकडे प्रेम होते. धनजीचे वैभव वाढत चालले. प्रशस्त घर बगीचा केला. पण बंगल्याच्या डाव्या बाजूला तो कृष्णमंदिर व तुळशीवृंदावन बांधायला विसरला नाही.

तायडीला सुस्वरूप अशी पाच अपत्ये झाली. मुलांवर धार्मिक सुसंस्काराच्या दृष्टीने दोघेही जण आपले धार्मिक तत्वज्ञान मुलांना सांगत. पण मुले एकंदर पेहराव व चालीरीती यांनी पारशीच निघावी अशी तरतूद तो करी. पण मुले विलक्षण मातृभक्त होती.

या परिवारातही तायडीच्या मनात घरच्या आठवणी दाटून येत. कृष्णभक्ती करताना तिला घरचे तुळशीवृंदावन आठवे. आई वडिलांचे कृपाछत्र, त्यांचे प्रेम तिला आठवे. मुले मोठी होतात तो धनजीची प्रकृती ढासळू लागली. आपण आता जगत नाही हे लक्षात येताच त्याने मृत्यूपत्र केले, आणि शेवटी तायडीला सांगितले की, ''माझी मुले पारशी समाजात मोडतील असे कर. तुझा गोपालकृष्ण तुला सुखी ठेवो.'' [१३] दादीशेटच्या मुलांनी धनजीचे सर्व काही केले. शाळेतील पारशी मुले तायडीच्या मुलांना बामनिया, बामनिया म्हणून चिडवत असत. मुलांना पारशी धर्माचे जे जे शिक्षण अवश्य ते ते तिने देवविले व धनजीची इच्छा पूर्ण केली.

मुले मोठी झाली. त्यांची लग्ने झाली. आपली धर्मकृत्ये मुलांना, त्यांच्या बायकांना आवडायची नाहीत हे स्वत: समजून घेऊनच तायडी एका स्वतंत्र बंगलीत रहात असे. ब्राह्मणांनी आपल्याला खांद्यावरूनच स्मशानात न्यावे व माझे आई वडील पुन्हा भेटावी अशी तिची इच्छा तिने फेरोजकडे बोलून दाखविली. फेरोज कोणालाही न कळता आईला कोकणच्या गावी घेऊन गेला. वृध्द मात्या पितरांच्या पायावर तायडीने लोटांगण घातले. फेरोजला त्यांनी जवळ बसवून

घेतले. शेवटी तायडीने नानांच्याकडून नेलेली बालकृष्णाची मूर्ती त्यांना परत दिली. पहाटेच्या वेळी तायडी व फेरोज परतली.

तायडी आता सुकत चालली. तिचे आयुष्य संपत आले. ब्राह्मणांनी आपल्याला खांद्यावरून स्मशानात न्यावे या तायडीच्या इच्छापूर्तीसाठी फेरोजने ब्राह्मणांकडे चौकशी केली. प्रायश्चित्ताची भाषा निघताच तिने त्याला नकार दिला. मृत्यूपत्रात ब्राह्मणी स्त्रियांच्या बाळंतपणासाठी पंधरा हजाराची तरतूद करून तिने प्राण सोडला.

## व्यक्तिचित्रे-

**तायडी-** तायडी ही या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा. नारोपंतांची ही मधली मुलगी. तिचा नवरा पुरूषोत्तम पंधरा सोळा वर्षांचा असतानाच सर्पदंशाने गतप्राण होतो व नियतीच्या तडाख्याने दहाव्या वर्षीच तिच्यावर वैधव्याची कु ऱ्हाड कोसळते. चारचौघात गप्पा मारणे, भावंडांच्यात मिसळणे यासाठी तिला केवळ विधवा आहे म्हणून प्रतिबंध केला जातो. पण ही बंडखोर व्यक्तिमत्वाची स्त्री धनजी नावाच्या पारशी गृहस्थाबरोबर संसार करते. समाज बहिष्कृतीचा धोका पत्करूनही जिद्दीने संसार थाटते. पुढे तायडीला पाच अपत्ये होतात. अगदी परस्परांच्या वैचारिक किंवा धार्मिक विचारांच्या आड न येता ही समाजमनस्क स्त्री मुलांवर पारशी पध्दतीचे संस्कार करते. ती कृष्णभक्त आहे. मुलांची लग्ने होतात. आपले धर्मकृत्य मुलांना त्यांच्या बायकांना पटणार नाही या विचाराने ही समजूतदार स्त्री वेगळ्या बंगल्यात राहते.

पण तायडीच्या मनावर परंपरागत संस्कार दृढ आहेत. तायडी पारशी धर्मीय व्यक्तीबरोबर राहून वेगळेपणा सिध्द करते, पण आपले दहन हिंदुंनी खांद्यावरून नेऊन करावे असे तिला वाटते. तायडी देहधर्मामुळे धनजीबरोबर गेली पण जाताना हिंदु स्त्रीचे मन घेऊन गेली. हिंदु स्त्रीचा संस्कार घेऊन गेली. ब्राह्मणांनी या गोष्टीस नकार देताच आपण पातकी नाही हा उद्‌गार तिच्या बाणेदारपणाची साक्ष देतो. पण तिचे मन समाजप्रवण आहे. अमुक अमुक शहरात, आळीत आपल्या नावाने सुतिकागृह बांधावे व त्यात ब्राह्मण स्त्रियांची बाळंतपणे व्हावीत व यासाठी पंधरा हजार रक्कम लावावी यातून तिची समाजश्रध्दा प्रकट होते. पण ब्राह्मण स्त्रियांसाठीच का? असा प्रश्न इथे पडतो.

**धनजी-** धनजी एक पारशी गृहस्थ. दादीशेट व धनजी दोघे भाऊ भाऊ. या पारशी संस्कृतीत वाढलेल्या भावाभावांचा व नानांचा घरोबा आहे. कोकणातील माल इतर बाजारपेठत पाठविण्यासाठी हलविणे, देवघेवीच्या व्यवहारात सरमिसळीने वागणे इत्यादी सर्व कोकण परिसरातील कामे हे पारशी बंधु अगदी आपलेपणाने करतात.

धनजी हा मुंबईच्या कॉलेजमधून बी.ए. झालेला आहे. वयाने विशी बाविशीतला हा तरूण

मुंबईत राहिलेला असूनही विनयशील आहे. दादीशेट या आपल्या भावाला तो बापासारखा मानी. आपल्या शिक्षणाचा उपयोग करून घेऊन त्याने कोकण व मुंबई व्यापाराचा संबंध वाढविला. धनजीचा हा तल्लखपणा पाहून नानांनी त्याच्याशी भागिदारी ठेवली. नानांची विधवा मुलगी व तो संसार थाटतात. समाजाच्या रूढीविरूध्द वागुनही तो निष्ठावंत आहे. विश्वासघातकी किंवा दुष्ट नाही. त्याने तायडीशी संबंध तोडले तर समाज त्याला जवळ करील असे त्याच्या मित्राने त्याला कळविले, पण सामाजिक बहिष्कार त्याने खुशीने पत्करला.

तो धर्माभिमानी आहे. अनेक ठिकाणी व्यापाराच्या निमित्ताने धनजीला जावे लागे तेव्हा तेथील पारश्यांच्या आग्यारीला तो जाऊन येई. आपल्या धर्माची बंधने तो तायडीवर लादत नाही. एवढेच नव्हे तर धर्माने पारशी असूनही नवीन घर बांधताना त्याने घराच्या डाव्या पाकळीत सुंदरसे कृष्णमंदीर बांधवले व पुढच्या बाजूस एक तुळशीवृंदावनही बांधले. यावरून परधर्म सहिष्णुता त्याच्या मनात वास करीत होती, हे दिसते.

पण आपली मुले मात्र पारशी समाजात मोडतील असे कर असे तो सांगतो. मुलांवर देखील पारशी संस्कार व्हावेत ही त्याची तळमळ आहे. धनजी आणि तायडी हे पारशी व हिंदू पुरुष स्त्री एकत्र आले व त्यांनी संसार उभा केला. यात ते समाजाच्या रूढीच्या विरूध्द साहसाने व धैर्याने वागले. दोघांच्याही मानतील बंडखोर वृत्ती इथे दिसते. संसारात मात्र दोघेही एकमेकांच्या धर्मांचा आदर करतात. पण स्वत:चा धर्म सोडीत नाहीत. त्या दोघांची ही मर्यादा आहे.

**नाना**- नारोपंत नाना हे या कथेतील आणखी एक व्यक्ती. नर्मदाबाई ही त्यांची सहधर्मचारिणी आहे. खाऊन पिऊन सुखी असणाऱ्या या कुटुंबाचा नारळ काजूचा धंदा आहे. कसलेही व्यसन नसणारे, पैपाहुण्यांचे स्वागत अगदी यथातथ्य करणारे नाना कुणाच्या अध्यात मध्यात नसत. नानांच्या सचोटीच्या व्यवहारावर सर्वांचा विश्वास आहे. न्यायप्रिय व रूबाबदार असणारी ही आसामी लोकप्रिय आहे. यांच्या मायाळु स्वभावामुळे घरी समाधानाचे वातावरण आहे. जुन्या संस्कृतीत वाढलेले नारोपंतर फार विचारी होते.

तायडीच्या बालवैधव्यामुळे गप्पाटप्पा, चारचौघात वावरण्यास होत असलेला विरोध नानांच्यामुळे थोडा सैलावत असे. तायडी धनजीशेटबरोबर राहू लागते तेव्हा नारोपंत शरीरधर्म सर्वांना आहेत. प्रत्येक मुलीला त्यांचा निग्रह करणे शक्य नाही. अशी नर्मदाबाईंची समजूत काढतात.

हे सर्व करून देखील तायडी अखेर नानांना भेटायला जाते तेव्हा ती अजूनही श्रध्दाळू आहे, हे नानांना पुरेसे आहे. असे हे सुधारक व्यक्तिमत्व आहे.

**नर्मदाबाई**- तत्कालीन स्त्री समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे हे पात्र आहे. ही स्त्री

गतानुगतिक आहे. तायडी बालविधवा आहे म्हणून तिच्यावर सर्व निर्बंध नर्मदाबाई लादतात.

तसेच फेरोज, दादीशेट ही इतर कमी अधिक महत्वाची पात्रे आहेत.

## वातावरण-

कथेत दोन संस्कृतीची भिन्न पार्श्वभूमी आहे. माट्यांनी या कथेत एक वेगळीच समस्या सांगून तिची योग्य अशी सोडवणूकदेखील केली आहे.

बालविधवेला कोणत्या प्रकारचे जीवन जगावे लागते याचे चित्र या कथेत स्पष्ट केले आहे. घरी असे होणे म्हणजे सुंदर संसारचित्राचा टवका उडालेला आहे अशी समजूत त्या काळात होती. पण ही स्त्री माट्यांनी बंडखोर चित्रीत केली आहे. तरीही ती समाजप्रवण मनाची आहे.

दोन संस्कृतीचा मिलाफ त्यांना या ठिकाणी चितारायचा आहे. कोणीही कोणाच्या धर्मकृत्यांच्या आड न येता मानवी जीवन सुसह्य होऊ शकते हे या कथेत सांगितले आहे.

## संवाद-

कथेतील संवाद नागर भाषेत आहेत. तायडी जेव्हा धनजी बरोबर संसार थाटते तेव्हा नर्मदाबाईंच्या मनातील विचार पुढील उद्‌गारात दिसतात.

"अशा बायका काय नाहीत की काय ! घरोघर हे आहे. पण असं का कुणी करतं?"

"बरोबर आहे. त्या बायकांना मी थोरच म्हणतो. पण सर्वांना हे साधेल असं नाही."

"मला असलं काही सांगायला नको. मला अन्न गोड लागत नाही. मी आपल्या जिवाचं बरं वाईट करून घेईन अशानं."[१४]

तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे चित्र या संवादावरून स्पष्ट होते.

तायडीची आपले दहन हिंदु पध्दतीने व्हावे ही इच्छा पूर्ण करण्यासाठी फेरोज ब्राह्मणांकडे तशी चौकशी करतो. ते सांगतात-

"होय, प्रायश्चित. त्याने त्यांचा काही अपमान नाही. त्यांना लाजविण्याचा हेतू नाही. पण धर्मशास्त्राप्रमाणे हे अवश्य आहे." फेरोज आईकडे परत गेला. पण ती मोठी मानी बाई होती. ती म्हणाली, "मी प्रायश्चित्त घेणार नाही. मी पातकी स्त्री नाही."

ह्या संवादातून तायडीचा बाणेदारपणा दिसतो. तिच्या मर्यादेत तिची बंडखोरी यात स्पष्टपणे प्रतीत होते.

# ५.भिवरेच्या तीरावरील दोन देव

माटे यांनी संवादरूपी चिंतनातून भक्तीच्या क्षेत्रात श्रेत्रात श्रेष्ठ असलेला नामा व ज्ञानाच्या क्षेत्रात श्रेष्ठ असलेल्या ज्ञाना यांचा त्यांच्या क्षेत्रातील अधिकार कसा श्रेष्ठ आहे याचे चित्रण केले आहे.

चंद्रभागेच्या तीरावर यात्रा भरली आहे. नामसंकीर्तन अखंडपणे सुरू आहे. श्रेष्ठ कनिष्ठ भाव लयाला गेला आहे. श्रोत्यांचे एका ठिकाणी विस्तीर्ण कडे आहे. सुंभाचा दोर कमरेला व एक रकट्याची लंगोटी लावून किर्तन करणारा लोकांना वेगवेगळ्या रूपात दिसतो. कुणाला तो भक्त प्रल्हाद दिसतो, कुणाला रामचंद्राचा अंगद, कुणाला श्रीकृष्णाचा भक्त उध्दव दिसतो. तो सांगतो आहे 'आधी रचिली पंढरी। मग वैकुंठ नगरी। विठो समाधीचे सुख। बघता हरे तहान भूक। मी तो आता न करी काही। मन रंगले हरिच्या पायी ।।-'अस किर्तनाला रंग भरला आहे.

इतक्यात उजव्या बाजूला गडबड सुरू झाली. चार अल्पवयी मुले गर्दीतून वाट काढीत पुढे येत होती. सर्वांत पुढे असलेला अठरा एकोणीस वर्षांचा नुकतेच मिसरूड फुटू लागलेला असा मुलगा होता. डोक्याला बनातीची टोपी, कमरेला पंचा व गळ्याभोवती स्वच्छ धोतर असा त्याचा वेष होता. बुध्दीतील ज्ञान व चित्तातील भावना त्याच्या डोळ्यात स्पष्ट दिसत होती. त्याच्यामागून आणखी एक जण येता होता. तो थोडा खिन्न व उदासवाणा दिसत होता. वयाने तो पहिल्याहून मोठा होता. याच्यामागून दोन गोजिरवाणी मुले येत होती. एक मुलगा व एक मुलगी ! गर्दीतून वाट काढणाऱ्या या भावंडांकडे लोक मोठ्या कौतुकाने पाहत होते.

नामदेवाचे भोळे ध्यान नामसंकीर्तन करीत होते. गाता येत नव्हते, ना कुणाची साथ तरीही किर्तन सुरू होते. नामदेवांच्या शरीरावर अपेक्षेमुळे कसलेच सौंदर्य नव्हते. नामदेव व ज्ञानदेवांचा वडिलबंधु जो निवृत्ती यांची डोळे मिटल्या मिटल्या ओळख झाली. नामदेवाचे भजन मंद होऊन ओठच तेवढे हलत राहिले. डोळे उघडून नामदेव निवृत्तीनाथांकडे धावला. दोघांची भेट झाली व नामदेवाचे भजन पुन्हा सुरू झाले.

एकादशीच्या दिवशी भिवरेच्या तीरावर नामदेव व ज्ञानदेव बसले आहेत. त्याचे वर्णन श्री.म.माटे असे करतात. 'नामदेवाच्या शरीराची रया उपेक्षेने गेलेली होती आणि ज्ञानदेवाच्या शरीराची कदान्नाने तृप्त झाली होती. नामदेवाचे मुख करूणामय प्रेमाने स्निग्ध झालेले होते आणि ज्ञानदेवाचे आर्द्र बुध्दिमत्वाने झळकत होते, एकाचे नेत्र कायमचेच अर्धोन्मिलित झालेले होते, आणि दुसऱ्याचे तर 'विश्वाचा कवळ करावयास जणु' प्रफुल्लित बनले होते.' [१६] ज्ञानदेव व नामदेव हे दोन प्रतिभाशाली मुमुक्षु भिवरेच्या तीरावर बसले होते. त्यांच्या मनाचा मिलाफ झाला तेव्हा ते संवादाला प्रवृत्त झाले.

ज्ञानदेव-वासरे धावावीत त्या प्रमाणे आम्ही तुझ्याकडे धावलो.

नामदेव-तुझ्या काखोटीच्या ग्रंथ वाचनाने आम्ही धन्य झालो. तू एवढे शहाणपण कोठून मिळविलेस!

ज्ञानदेव-तुला स्वत:ला भक्तिवैराग्य जेथून आले तेथूनच मला ते आले.

नामदेव-तुझ्या त्या ओव्यांची गोडी अवीट आहे. आमचे शब्द भोळे भाबडे आहेत.

ज्ञानदेव-पण तुझा प्रेमळ भक्तिभाव मला आळविता येत नाही.

नामदेव-पण तुझे उड्डाण गरूडाचे उड्डाण आहे.

ज्ञानदेव-निवृत्तीनेच हा प्रसाद माझ्या मुखात घातला. माझ्या मनाला प्रेम रसाच्या धारा फुटून ब्रम्हालाही प्रेमरसाची भरती आली. पण प्रेमरसाची गोडी खरी तुलाच लाभली. सर्व गोष्टींचे सार जो प्रेमरस तो तुला लाभला.

नामदेव-असंख्य जीवांना जे सुख हरपले आहे ते मला विठ्ठलाने दाखविले. हरीचा दार झाल्यावरच मला निश्चीत मार्ग सापडला. 'सावळी श्रीमूर्ती हृदयी बिंबली' आणि त्यामुळे माझी देहबुध्दी पालटली.

ज्ञानदेव-आम्ही नाथपंथात होतो. सर्व भावंडे नीचाहून नीच होतो. आम्हाला श्रेष्ठपण नव्हते, धर्मज्ञान नव्हते. मी निवृत्तीला शरण गेलो. या सद्गुरुनेच माझ्या चित्ताची काजळी झाडून अद्वैताचा मेळ बसविला. मला प्रेमाचे स्फुंदन आले, अन् सूर्याचे तेज झळकू लागले. माझा देहभाव हरपला. 'अवघ्या बाही मी व्योम कवळिले' असे मला वाटू लागले. साऱ्या विश्वाच्या पसाऱ्याला जी ब्रह्माची गवसणी आहे तीच गवसणी माझ्या अंतरात्म्यालाही आहेसे वाटू लागले. सर्व देवाधिदेव, ज्याला रखुमादेवीवर म्हणतात तो दिसू लागला आणि तो माझ्या ठिकाणी अद्वैतपणे सामावून गेला आहे असे मला वाटू लागले. हे सारे निवृत्तीच्या कृपेने झाले.

यावर नामदेव आपणाला हा आनंद कसा प्राप्त झाला ते सांगतात. नामाच्या आश्रयाने विठ्ठलाने प्रेम पान्हा देऊन पांडुरंग भेटावा असे त्यांना वाटू लागले. केशवाच्या चरणाखेरीज कोणतेही ध्यान नसताना लाज सोडून नामदेव पतीत पावनाशी प्रेमळपणाने भांडू लागले. वैष्णवांच्या कुळीच्या कुळधर्माप्रमाणे नामावर विश्वास करून सुरूवात केली. हळूहळू दिशा निर्मळ होऊन प्रेमाचा पूर व सुखाचा सागर असलेल्या परमेश्वराने नामदेवाच्या शिरावर हात ठेवला व नामाला भक्तिसुख दिले. सावळी मुर्ती हृदयी बिंबली जन्म धन्य धन्य झाला. मन केशीराजाने भरून गेले. चित्तात केवळ केशीराज ध्याऊ लाले.

इतके असले तरी ज्ञानदेवांना नामाच्या भक्ती प्रांगणातील सुख भोगावे वाटते व नामाला ज्ञानवाटेचा महिमा कळावा अशी इच्छा आहे. भक्तीचा महिमा देखील अगाध आहे. ज्ञान मोठे आहे पण मनाला सुख वाटायला प्रेमळ भावच हवा.

यावर आरतीची वेळ झाली. नामाने त्या अगोदर एक अभंग म्हटला. अभंग संपताच नामा म्हणाला, ''ज्ञाना! तुझी ज्ञानेश्वरी चंद्रभागेच्या काठावर ठेव.'' ज्ञानेश्वराने ती ठेवताच त्याने आपले टाळ तिच्यावर ठेवले आणि तो म्हणाला, ''माझ्या टाळांना तुझ्या ज्ञानेश्वरीच्या पाया असू दे, आणि तुझ्या ज्ञानाला माझ्या टाळांनी प्रेमगोडी येऊ दे-''[१७]

या चिंतनाच्या आधारे नामदेव व ज्ञानदेव यांचा संवाद साधून दोहोंनाही ज्ञानप्राप्ती कशी झाली व ज्ञानाचा सोपान ज्ञानदेवांनी अंगिकारला तर नामासारख्या वैष्णवाने नामसंकीर्तनाने परमेश्वराचे प्रेम प्राप्त कसे करून घेतले हे सांगितले आहे. हे माट्यांचे संवाद कौशल्य श्रेष्ठ आहे. ज्ञान व भक्ती यांची परस्पर अनुकूलता प्रकट केली आहे.

ज्ञानदेव व नामदेव यांच्या व्यक्तिमत्वावर माटे यांनी इथे प्रकाश टाकला आहे. ही ऐतिहासिक भेट माटे यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर अत्यंत समर्पक भाषेत शब्दबध्द केली आहे. चंद्रभागेच्या तीरावरील ज्ञानदेव व नामदेव यांच्या भेटीला या लेखनात दृश्यात्मकता लाभली आहे. येथील भेटीच्या चित्रणाला दृकसंवेदना लाभली आहे. या चित्रणात कालविपर्यास घडलेला नाही. काळाचा संदर्भ नेमकेपणाने सांभाळून केलेले हे चित्रण माट्यांच्या प्रतिभेचे सामर्थ्य प्रकट करते.

या लेखनाला कथेच्या प्रकारात बसविणे कठीण आहे. हे एक मुक्त चिंतन आहे. हे निवेदन म्हणजे एक संवाद सुंदर घटनाचित्र आहे.

## ६. या पोराला आता तूच सांभाळ !

नरहरी नावाच्या साहसी व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकण्यासाठीच जणू माट्यांनी ही कथा लिहिली आहे. हे साहसी पण हाच नरहरीचा स्थायीभाव आहे.

कथानक-

सुंदराताईंचे लग्न मोठ्या थाटामाटात झाले. सुंदराताई हे तिचे माहेरचे नाव. पण सासऱ्यांनी माहेरच्या नावाने हाक मारायला सुरूवात केली. ते नाव सर्वांच्या तोंडी झाले. नरहरी एकोणीस-वीस वर्षांचा होता. बाबांनी नरहरीला रूद्र, महिन्म, त्रिसुपर्ण, स्तपावळी, समासचक्र इ. पढविले होते. नरहरी चलाख होता. शाळेत मास्तरांची त्याच्यावर मर्जी होती. नरहरीचे लक्ष

तालीमखान्याकडे व खेळाच्या पटांगणाकडे जास्त होते. नरहरी शरीराने धष्टपुष्ट होता.

घरी सर्व तऱ्हेची समृध्दी होती. पाहुण्याराावळ्यांची येजा बरीच होती. सुंदराताई सर्वांचे हसतमुखाने करीत. सासरा संध्याकाळच्या वेळी तिच्याकडून रोज केसरी वाचून घेई. संसाराची सर्व सूत्रे सासुबाईंनी सुनेच्या हाती दिली. सुंदराताई हा कारभार मोठ्या दक्षतेने करीत. सासुसासऱ्यांना हे पाहून आनंद वाटे. सासुबाई सुनेवर घर सोपवून देवधर्मात गर्क होऊन गेल्या. देवळातून यायला जेव्हा त्यांना उशीर होई तेव्हा सुनबाई त्यांची वाट पहात असत.

काळाप्रमाणे नरहरी गृहस्थ बनला. शारीरिक दांडगाई बरोबर त्यांच्या ठिकाणी एक मानसिक दोषही जाणवू लागला. एका बुक्कीने नारळ एकदा फोडला आणि एक महिन्याचे दुखणे झाले. सुंदराला त्याच्या हिमतीचे व सामर्थ्याचे कौतुक वाटे. शाळेतील मित्रमंडळींत हा वांड असल्याने मित्र त्याच्याशी आदबीनेच बोलत. दांडग्या नरहरीची शाळा सुटली. तो पुढारी म्हणून वावरू लागला.

सारी मित्रमंडळी बोलत बसली असता काकांचे तोंड मिटत नाही म्हणून गणू सांगत आला. नरहरीने एक खिळा लाल करून उघडलेल्या जबड्यात खुपसण्याचा प्रयत्नक रताच जबडा खाली आला. बाबांना सुध्दा या गोष्टीचे नवल वाटले.

गावच्या नदीला प्रचंड पूल होता. पूलाला लोखंडाचे मच्छ होते. एखादा आडवा गज त्यांना मारलेला असे. नरहरी जणू आपल्या खोलीत बसला आहे अशा आविर्भावात मच्छात जाऊन बसला. बाबांनी हे पाहिले. मोठ्या कष्टाने ते घरी आले. काळजीच्या स्वरात म्हणााले, 'या पोराला आता तूच सांभाळलं पाहिजेस.' नरहरी व सुंदरा मुलाबाळांसह पंधरा दिवस केव्हातरी सासुरवाडीला जाऊन येत. सासुरवाडीच्या मंडळीतही नरहरीचे कौतुक होई.

पावसाचे दिवस होते. नदीला पूर आला होता. नरहरीने वडाच्या फांदीवरून महापुरात उडी घेतली. पोहत खाली जाता जाता जेथे अवखळ ओढा लागतो तेथे भोवरा लागला. भोवरा लागताच सर्व जण सावरले. पण भीमरावला पाणी हटेना. नरहरीने वळून पाहिले तर भीमराव भोवऱ्यात अडकला होता. भीमरावला नरहरीने भोवऱ्यातून वाचविले. भीमरावच्या आईने जन्मभर त्याचे उपकार विसरणार नाही असे उद्गार काढले. पुण्याच्या एका प्रसिध्द वर्तमानपत्रात नरहरीचा फोटोदेखील आला. दुसऱ्याचा जीव वाचविणे चांगले पण त्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालायचा याला काय म्हणावे? भीमरावने गळ्याला मिठी मारली असती तर अशा एक ना हजार शंका सुंदराच्या मनात येऊ लागल्या. 'या पोराला आता तूच सांभाळ', हे सासऱ्यांचे नित्याचे बोलणं खरं आहे असेच ती मनाशी म्हणू लागली.

नरहरी मोठा माणूस होत चालला. घर, शेतीचा व्यवहार तो चोखपणे पाही. कुळे, ऋणकोशी

सौजन्याने वागे. संसारातले पूर्ण लक्ष काढून सासुबाई पुराणात मग्न झाल्या.

एकदा संध्याकाळी जेवण सुरू असतानाच समोरच्या घरातला छब्या त्याच्या घरी साप निघाल्याची वार्ता सांगत आला. पाठोपाठ नरहरीला बोलावणे आले होते. नरहरी चटकन उठला. जुन्या मातीच्या बिळातला नाग नरहरीने शेपटीला धरून बाहेर काढला. शेजारच्या मोरीवर भिरकावून आपटला. शेंदाड फुटावे तसा नाग फुटला. बाबा व सुंदरा यांनी तो देखावा पाहिला. आमचे डोळे मिटले म्हणजे काही करा. पोरीच्या कुंकवाकडे तरी पहा अशा सूचना बाबांनी दिल्या. पण आपले यात फार काही चुकले नाही असे नरहरीला वाटले. नरहरीची लोकप्रियता जशी वाढली तसा तो घरच्या माणसांच्या अधिकच काळजीचा विषय बनला.

नरहरी उर्फ नाना पुढे एका बुवाच्या नादी लागला. बुवा त्यांना आपली विद्या शिकवीत असे. संपादलेली विद्या दाखविण्याचा विचार त्यांच्या मनात घोळू लागला. नानाची साहसीवृत्ती त्याला गप्प बसू देत नव्हती. लांबलचक पुलाच्या लोखंडी भिंतीवरून निर्भयपणे तोल सांभाळून नाना चालून गेला. चार सहा महिन्याच्या आत 'या पोराला आता तूच सांभाळ' असे सांगून सासुबाई व मामंजी मरण पावले. गोसावी बुवांच्या नादी लागून नानांनी जिल्ह्याच्या गावी निखाऱ्यावरून चालत जाण्याचा यशस्वी प्रयोग करून दाखविला. मी असले प्रयोग करमणूक म्हणून करतो. मी त्याचे बक्षीस घेण्यास डोंबारी नाही हे सांगायला मात्र नाना विसरले नाहीत.

नानांच्या घरी आता समाधानाचे वातावरण होते. सर्व व्यवहार काळजीने सुंदरा पहात असे. नानांचा हा सुखी संसार पाहून त्यांच्या वृध्द मास्तरना देखील आनंदाचे भरते येत असे. पण नानांना मात्र हे जीवित आळणीपणाचे वाटे. त्यांना नेहमी साहसी कृत्यांची ओढ लागलेली असे. या साहसी कृत्यात ना स्वार्थ ना परमार्थ असा सुंदराचा शेरा त्यांच्या मनात घर करून बसला होता. साहस मुद्दाम उकरून काढण्यात दम नव्हता. पण नानांना चैन नसे. परड्यात जाऊन उंच झाडाच्या फांद्या तोडतील, कोणाची घागर विहीरीतून काढून देतील. पण आळशीपणा त्यांना नकोसा वाटे.

अमावस्येच्या रात्री पेटत्या घरातून वरच्या मजल्यावर आगीत सापडलेल्या रघुनाथला काढण्यासाठी लोकांची धडपड चाललेली असते. पण आग भयानक स्वरूपाची असते. नानांनी रघूला वाचवायला जाण्याची केलेली तयारी व मजला जीन्यासकट खाली कोसळण्याची वेळ एकच येते. सुंदराचा शहाणपणा या ठिकाणी कामी येतो. ती त्यांना जाऊ देत नाही.

पण या प्रसंगाने नाना इतके कोसळतात की त्यांची प्रकृती ढासळू लागते, त्यांना चैन पडत नाही. ते दिवसेंदिवस क्षीण होत जातात. यावर माटे भाष्य करतात, "-आणि नवऱ्याच्या म्लान होत चाललेल्या मुखाकडे बघत बसणाऱ्या सुंदराने तरी काय करावे हे कोणी सांगेल काय? या माणसाचा सांभाळ आता कोण करील बरं? तो सुंदराला करता येईल काय?" [१८]

## व्यक्तिचित्रे-

**नाना-** नाना उर्फ नरहरी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. नरहरी चलाख आहे. त्याला रूद्र, महिन्म इ. चे शिक्षण वडील देतात. पण त्याचे लक्ष त्याकडे नाही. नरहरीचे सर्व लक्ष तालीमखान्याकडे व खेळाच्या पटांगणाकडे आहे.

नरहरीच्या धष्टपुष्ट शरीराचे वर्णन श्री.म.माटे करतात, 'नरहरी चांगला पोसत चालला होता, त्याच्या छातीचे तकट उचलू लागले होते. खांद्यापासून मानेपर्यंतचा भाग दोरखंडासारखा ताठ, फुगीर आणि वळलेला दिसे, बरगड्यांपासून खाली कमरेपर्यंतचा भाग निरूंद असून वरचा छातीकडचा प्रदेश मात्र रूंदावत गेलेला दिसे. दंडातील स्नायूंची हालचाल आणि प्रत्येक हालचालीबरोबर दंडाला पडणारे उभे कर्वे हे नरहरीचे वैभव होते. सर्वांच्याही वर त्याच्या ओठावर कोवळे मिसरूड फुटलेले होते. पाणी भरणे, पफसंगी लाकडे फोडणे इत्यादी कामे नरहरी करी. उठाबशा काढणे, पळणे, मल्लखांब करणे या व्यायामाने नरहरीच्या मांड्या आणि पिंढऱ्या या प्रसंगी लाकवट सागवानाच्या शंक्वाकृती सोटासारख्या शोभिवंत दिसत. [११] शेतीवाडीची कामे पाहणे, देवघेवीचा सर्व व्यवहार पाहणे इ. सर्व काम नरहरी लक्ष देऊन करी. ऋणको, कुळे यांच्याशी त्याचे वागणे सौजन्याचे होते. पण काहीतरी निराळे साहस करण्याचा गुण त्याच्याकडे आहे. पण तो त्याच्या अंगचा स्थायी गुण आहे. ही सर्व कामे परमार्थाची आहेत असा त्याचा समज आहे. याखेरीज सारे जीवन त्याला आळणी व मेषपात्रपणाचे वाटते.

सुरवातीला त्याची पत्नी सुंदरा हिला त्याच्या साहसीपणाचे कौतुक वाटते. पण नंतरच्या 'या पोराला आता तूच सांभाळ' या सासऱ्यांच्या सुचनेशी सहमत होते. पण साहसीपणा हा त्याचा स्थायीभावच आहे. एका बुक्कीत नारळ फोडणे, गणूच्या काकांच्या जबड्यात लाल तापलेली सळी धरून तो बंद करणे, नाग आपटून मारणे ही साहसी कृत्ये तो करतो.

अमावस्येच्या रात्री जळत्या घरातील मुलाला वाचवायला जायची नरहरीची इच्छा असते. पण सुंदराने केलेल्या अटकावामुळे तो जाऊ शकत नाही. जायला न मिळाल्याने त्याची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत जाते. अंगातील साहस जिरवावे लागल्याने कोणतेही औषधपाणी त्यावर लागू होत नाही. आता याचा सांभाळ कोणी करावा असा प्रश्न निर्माण होतो. साहसी कृत्ये करणाऱ्याला थोपवून चालत नाही. त्यालाच सांभाळण्याचा प्रश्न प्रतिबंध निर्माण केल्यावरच निर्माण होतो. असे हे एक साहसी व्यक्तिमत्व आहे.

**सुंदरा-** ही एक सर्व सामान्य प्रापंचिक स्त्री आहे. ही सोळा वर्षाची मुलगी पण अंगात कामाचा आटोप आहे. अगदी थोड्याच दिवसात ती घरची कर्ती सवरती सून बनते. ''सुंदरा भारी चालीरीतीची हो ! अलीकडच्यासारखी नाही.''[११] हा सासुबाईंचा तिच्या बद्दलचा

उद्‌गार तिच्या गृहकृत्यदक्षतेची साक्ष देतो. सासरे देखील सुनबाईंच्या या वागण्यावर एकदम खुश आहेत.

सुंदरा थोड्यात दिवसात घरची सून बनते. घरी पाहुण्या रावळ्यांची येजा पुष्कळ असते. पण सुंदरा हसतमुखाने सारे करते. तिच्या कामाची पध्दत श्री.म.माटे वर्णन करतात, 'प्रपंचातील निम्मीअर्धी कामे तीच झपाटून टाकी. पैसे किती आले, कुणाकडून आले, मतलबी लोक कोण, खरे प्रामाणिक कोण, आपली शेतेभाते कुठे आहेत, आवंदा काय काय लावले आहे, मळणी केव्हा आहे, खळ्यावर केवढ्याची रास झाली आहे, आटलेल्या गायी म्हशी कुठे धाडावयाच्या, नाना घरी नसला तर एखाद्या वेळी जातीने शेतावर जाऊन टेहळणी ठेवायची हा सारा आटोप तिच्या ठिकाणी आला होता.' एक मर्यादशील सून म्हणून या कथेत तिची प्रतिमा आहे. या कथेत ती आणखी विशेष कृत्यात भाग घेत नाही.

नवऱ्याच्या साहसीपणाचे सुरवातीला तिला कौतुक वाटते. पण नंतर काळजी वाटू लागते. पुढे त्या साहसी कृत्याला केलेला अटकाव तिच्या जास्त काळजीचे कारण बनतो.

याखेरीज बाबा व सासुबाई ही पात्रे अनुषंगाने येतात.

## वातावरण-

या कथेत निवेदनासाठी व संवादासाठी देखील नागरभाषेचाच वापर केला आहे.

गोसावी बुवाच्या नादी लागून नाना जेव्हा निखाऱ्यावरून चालत जाण्याचा साहसी प्रयोग करतात तेव्हा लोकांचे उद्‌गार नानाला साहसी कृत्ये करण्याचा नाद आहे अशा सवयीचे निदर्शक वाटतात.

''अहो, हे तर त्या ह्या गावचे नाना !''

''दिसताहेत खरे बुवा ! यांना हे व्यसन कुठून लागलं कुणास ठाऊक !''

''अहो ! परवा यांनी आपल्या शेतावरची बारा बैलांची मोट ओढली !''

''ते तर काहीच नाही. परवा यांनी एकदा शेतावरच्या मस्त खोंडाला हुलकावण्या देऊन नुसता दमवून खाली पाडला !'' [२०]

या कथेत अद्‌भुताचा आश्रय माट्यांनी घेतलेला आहे. घटनेला आहे तसेच न रंगवता अद्‌भुताचा रंग भरल्याने कथा तेवढी परिणामकारक ठरत नाही. केवळ नरहरीच्या साहसासाठी प्रसंग निर्माण करून कथा लिहिली आहे असे वाटते.

# ७.मंगळवेढ्याचे कुसू

श्री.म.माटे यांनी अध्यात्मिक तत्वज्ञान इथे मांडलेले आहे. पण ही कथा नाही. चोखोबा संत चोखामेळा पदापर्यंत कसा पोहचला याचे प्रतिपादन येथे केले आहे.

परमेश्वराची दारे युगानुयुगे बंद होती. पंचमहाभुते देखील क्षीण झालेली होती. तंत्राला महत्व येऊन कर्मकांडांचे महत्व वाढत होते. मंत्र होते पण त्याला मनाची ओळख नव्हती. ज्यांचे जीवित राजासारखे सुस्थीर आहे त्यांना देव स्थायी स्वरूपाचा चाले. ज्यांच्या जीवितात सुखाची वार्ताच नाही त्यांना देवाची ओळख होणार केव्हा?

वरीष्ठांच्या परमेश्वराचीच करूणा भाकायची शूद्रातीशूद्र लोकांना चोरी होती. कोंबड्या बकरी मारून देवाचे हिडीस रूपच या लोकांनी सहास्त्रवर्षे पाहिले होते. जाखाई जोखाई या देवतांचीच पूजा त्यांनी केली होती. परमेश्वराची कृपा कधी काळी आपल्यावर होईल का? नाम गायनाचा अधिकार कधीतरी आपल्याला मिळेल का? अशा प्रकारचे प्रश्न त्यांच्या मनात वारंवार उत्पन्न होत.

पिढ्यान पिढ्या या लोकांनी केवळ वरच्या समाजाची सेवाच केली. प्रत्येकाच्या कामाचे स्वरूप वेगळे पण अत्यंत हलकी कामे त्यांच्याकडून करून घेतली गेली. कुणी लाकडे फोडली, कुणी डोकी केली, कुणी ढोरे ओढली. ही सर्व पिढ्यानपिढ्या कैची इतकी घट्ट होती की यातून कुणालाच हलता येत नसे. त्यांचे मूळ देव त्यांना नको होते कारण धर्माचे कोणतेच समाधान त्यांना मिळत नव्हते. अशी भक्ती की गायन, हर्षयुक्त मनाने केली जाते ती भक्ती आपल्याला कधी काळी मिळेल का हे प्रश्नचिन्ह शूद्रातीशूद्रांच्या मनात होते.

पंढरपूरात चंद्रभागेच्या तीरावर एक वेगळीच क्रांती घडून येत होती. ज्ञानदेव व नामदेव यांना धर्मग्लानी नष्ट करायची होती. विठ्ठल संप्रदाय वाढत चालला होता. 'मी सर्वांचा आहे' हा श्रीकृष्णाचा संदेश तो सर्वांना सांगत होता. भगवंताचे नाम भक्तीने घेतले तर मोक्ष मिळू शकतो. नामजप करण्याचा अधिकार वाटेल त्याला आहे. मोक्ष साधनास नाम हे जास्त समर्थ आहे. देवाच्या दारात भेद नाही. तो सर्वांचा आहे. स्त्री, पुरूष, गरीब, श्रीमंत त्याला सारखेच. त्याच्या पाशी सर्वांना सारखाच अधिकार आहे. ज्याने चौऱ्याऐंशी लक्ष योनी निर्मिल्या तो कोणाच्या स्पर्शाने विटाळणे शक्य नाही. त्याची कृपा सर्वांना लाभते. परमेश्वर आपल्याकडे पहात नाही असे सर्वांना वाटते. पण सर्व प्राणीमात्रांना तो सारख्याच दृष्टीने बघतो. परमेश्वराचे भजन अखंड करा. प्रेमाने करा. त्याठिकाणी श्रध्दा ठेवा. नामाचा अधिकार सर्वांना आहे आणि त्याद्वारे मोक्ष मिळविण्याचा अधिकारही सर्वांना आहे. सर्व जातीयांना नामाच्या सहाय्याने परमेश्वराच्या रूपात मिळून जाता येईल. अशी व्यवस्था श्रीकृष्णाने करून ठेवली आहे. हे

ज्ञानेश्वरांचे भाषण संपताच नामदेवांनी किर्तनाला सुरूवात केली.

नामाचे भजन सुस्वर होते. नामा देहभान विसरून किर्तन करीत होता. नामस्मरण व नामगायनाने मुक्ती मिळते हे तो रंगवून सांगत होता. ''आपणा सर्वांना यमाची भीती वाटते, ते योगी, ते वेदपठण करणारे ब्राह्मण, ते यज्ञयाग करणारा ब्राह्मण, ब्राह्मणांकडून ब्रह्मज्ञान ऐकणारे ते क्षत्रिय, वैश्य या भीतीतून मुक्त होतील असे आपणाला वाटते, ते मुक्त होत असतीलही, पण माझ्या शुद्रांनो, अतिशुद्रांनो तुम्ही विठ्ठलाचे नाव घ्या. भक्तियुक्त मनाने ते गा म्हणजे तुम्ही उध्दरून जाल, कसलीही भीती धरू नका.'' [२१] ज्ञानदेव परलोकीचे तारू आहे या मुनींचा आश्रय करा असे सांगून नामदेवांनी किर्तन संपविले.

या सर्व विवेचनाचा मंगळवेढ्याच्या त्या तरूण मुलावर विलक्षण परिणाम झाला. नामापुढे येऊन तो उभा राहिला. आपण महार आहोत. आपल्याला उध्दार करून घेण्याचा हक्क आहे का? नामाने त्याच्या चित्तातील संशय काढून टाकला. पुन्हा एका परमेश्वराची भक्ती करण्याचा अधिकार सर्वांना आहे हे त्याच्या मनावर ठसवून नामाने त्याला आपला शिष्य करून घेतले. एक महार पंढरीचा भक्त झाला. चोखाने नामाला गुरू केले अन् महाराष्ट्रात अध्यात्मिक लोकशाहीचा झेंडा फडकला. महाराष्ट्रात एक प्रचंड क्रांती झाली.

चोखा व त्याची बायको सोयरा दोघेही प्रापंचिक जीवनात सुखी होते. घरात वडिलधारे माणूस नसल्याने दोघेही एकमेकांच्या संगतीने प्रेमाने रहात. ज्ञानदेव व नामदेव यांच्या तोंडचे ते शब्द ऐकल्यापासून चोख्याच्या वर्तनात फरक पडला. चोख्याच्या घरी भजन सुरू झाले. महारवाड्यात विठ्ठलाचे भजन हा चर्चेचा विषय झाला. चोख्याने आपल्या विचारात आचारात देखील मनापासून बदल केला. प्रपंच मिथ्या आहे हे त्याच्या मनाने घेतले. सोयराला या गोष्टीची स्त्री स्वभावधर्माप्रमाणे रूखरूख लागली. पण त्याच्या व्यक्तिमत्वात लोपून जाण्याची तिने ठरविले होते आणि तिलाही तशी बुध्दी झाली. भजन चोखा करेल आपण त्याला साथ तरी करावी असे तिला वाटू लागले. परमेश्वराच्या प्रेमळ भजनात ती दोघे रमून गेली.

हळूहळू चोख्याचे लक्ष प्रपंचातून कमी होऊ लागले. दर एकादशीला तो पंढरीला जाऊ लागला. सोयराही त्याच्या बरोबर जाऊ लागली. दोघेही द्वादशीला परत येत. प्रपंच नाशिवंत आहे हे सोयराला देखील पटू लागले. शेतीची कामे करता करता भजने करणे, ज्ञानदेवांच्या ओव्या समजून घेणे हे ही सोयरा आनंदाने करू लागली. बायको आपल्या परमार्थमार्गात आड येत नाही, उलट आपल्याला सहाय्य करते हे पाहून त्याला समाधान वाटे. जे होईल ते ईश्वरेच्छेने असे त्याला वाटू लागले. अशा प्रकारे भक्तिरसात पोहणाऱ्या माणसाचे कौटुंबिक जीवन सुखी होते. निर्मळा नावाची त्याला एक बहिण होती. सोयरा व चोखा या प्रेमळ जीवन कंठणाऱ्या जोडप्याला मुलगा झाला त्याचे नाव कर्मा असे ठेवले.

पंढरपुरास नामाची भजने व किर्तने ऐकण्याखेरीज चोख्याला दुसरा उद्योग नव्हता. त्याला विठ्ठलाचे दर्शन करवले. हर्ष निर्भर होऊन तो नाचू लागला. सारा शीण भाग हरपला, त्याला जन्माचे सार्थक वाटू लागले. सुंदर मुखकमल कस्तुरीचा मळवट, कानात मकराकार कुंडले, गळ्यात वैजयंती, हातात शंख, चक्र, गदा, पद्म असे विठ्ठलाचे रूप पाहून त्याची तहानभूक हरपली. ज्याच्या नावाचा उपदेश नामाने त्यांना दिला तो जगदीश्वर पाहताच चोख्याला धन्य वाटले. चोखोबाची गणना आता श्रेष्ठ संतमंडळीत होऊ लागली. एकदा एक वृध्द ब्राह्मण चोख्याच्या घरून दूधभात खाऊन गेला. तो दुसरा तिसरा कोण नसून प्रत्यक्ष विठ्ठलच असे चोख्याला वाटले. पंढरीरायाला पाहुन त्याचे मी तू पण गेले. निर्मळा, बंका हे ही भक्तिमार्गात पडले. चोखोबाचा मुलगाही श्रेष्ठ भक्त बनला. त्याने उत्तम अभंगरचना केली. चोख्याचे कुळ पवित्र बनले.

एके दिवशी मंगळवेढ्याच्या महारवाड्यात एक दवंडी पिटली. सरकारी हुकुमावरून सर्व महार पोरांना चावडीसमोर बोलावले गेले. मंगळवेढ्याला कुसु घातलेच पाहिजे हे सरकारने ठरवले. कुसु बांधायचे तर हजारो कामकरी माणसेच गोळा केली पाहिजे. त्याला घाम गाळणारी पोटासाठी मरणारी माणसेच हवी. म्हणून दवंडी पिटण्यात आली. मंगळवेढ्याला कुसू घालायच्या सरकारी कामाला मजूर हवे होते. हुकुम सुटले की तमाम महारांनी मंगळवेढ्याला येऊन हजर रहावे. या बोलावण्याला चोख्याने दाद दिली नाही. पण सरकारी हुकुम असल्याने वारंवार त्याची चौकशी केली जाई. तो घरच्या कुठल्याच कामाकडे लक्ष देत नसे तर कुसवाच्या कामाला तरी त्याचे लक्ष कसे असणार? वारंवार येणाऱ्या कोणत्याही सरकारी सूचनेला चोख्याने दाद दिली नाही.

पंढरपूरच्या वाळवंटात चोखा भजनात दंग होता. एकादशीच्या दिवशी चोखा लोकांना अद्वैताचे तत्वज्ञान सांगत होता. देवाने माझ्या हृदयातच वस्ती केली आहे. सगळीकडे देव आहे. सगुणात निर्गुण पहावे लागते आणि सगुणाच्या वाटेनेच निर्गुणाकडे जावे लागते. हे सर्व भाव बळाने साधते असे सांगण्याचा अधिकार चोख्याला प्राप्त झाला होता. माझ्या देहातच मी विठ्ठल भक्ती केल्याने तो राहू लागला आहे हे तो सांगतो. चोखा अशा प्रकारचे निरूपण करीत होता तोपर्यंत सरकारी शिपाई चोख्याला पकडायला धावले. चोख्याच्या गळ्यातली तंबोऱ्याची अन् चिपळ्यांची त्या शिपायांना काय किंमत? बाहेरच्या बाजूने बरेचसे शिपाई आले त्यांनी चोख्याला ओढतच बाहेर नेले. सरकारची कामे तुझ्या बापानी करायची काय? असे ते त्याला म्हणू लागले. जातानाही चोखा विठ्ठलाची भक्ती सोडू नका असा संदेश भक्तांना देऊ लागतो. प्रत्येक कामात विठ्ठल शोधण्याचे त्याचे व्रत मात्र कुसवाच्या कामावर असताना सुध्दा चालू राहते. 'रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी ।। तो हा माधव बरवा, तो हा विठ्ठल बरवा ।।' असे ज्ञानाचे भजन तो सर्व वेठीदार महारांच्या सोबत म्हणत असे. या त्याच्या कृत्यामुळे सरकारी मुकादमांचा

त्याच्यावर दात होता. पण संत पदाला पोहचलेल्या चोखोबाने आपली वाणी कधी बाटविली नाही. आणि चोखोबाला ते शक्य नव्हते.

सोयरा जेव्हा दुपारी भाकरी घेऊन येत असे. तेव्हा रात्रंदिवस कुसु तयार करण्याच्या कामावर त्याला पाहून तिला वाईट वाटे. पण कर्माच्या फेऱ्यातून कुणाची सुटका नाही. ज्ञानदेवांना ते चुकले नाही. मग मी तर त्यांच्याहून कुठे मोठा आहे? अशी चोखा तिची समजूत घालीत असे. नवरा बायकोत अलोट प्रेम होते. त्याचे ते रोजचे हाल पाहून चोख्याच्या वाटणीचे काम ती स्वत: करीत असे. पण रोजचे नेमून दिलेले काम चोख्याला करावेच लागे. रात्रीच्या वेळी मंगळवेढ्याचा महारवाडा चोख्याच्या किर्तनाने भजनाने दुमदुमून जाई. उतारवय झाले तरी नेमाचे काम त्याला करावेच लागे. त्यामुळे चोखा उदास बनत चालला. मधून मधून नामदेवाचे व ज्ञानदेवांचे स्मरण करून चोखा अभंगरचना करी. अनंतभट अभ्यंग हा ब्राह्मण ते अभंग उतरून ठेवी.

चोख्याला पैलतीर दिसू लागले होते. कुसवाचे काम जवळजवळ संपत आले होते. बांधलेल्या कुसवाच्या सावलीत काही महारमंडळी विश्रांती घेत होती. चोखा मात्र प्रेमातिरेकोने विठ्ठलाच्या भजनात दंग होता. पण या कुसवाच्या कामाने आपण पंढरी विसरलो. त्याचे ध्यान विसरलो. इथे असंगाशी संग आहे. आपली यातून केव्हा सुटका होईल असे त्याला वाटू लागले होते. चोखोबाचे नेत्र पैलतीरी लागले होते. आपले कर्म वाईट म्हणूनच आपल्याला कुसवाच्या कामावर यावे लागले असे तो समजला. पण पुढचा जन्म आपल्याला पंढरीतच मिळावा असे त्याला वाटू लागले. घडी घडी आता त्याला परमेश्वराशी एकरूप होण्याची आस लागली. चोख्याचा असा परमेश्वराशी संवाद सुरू असतानाच चांगले बांधलेले कुसु धडाडून खाली आले. चोख्याच्या अंगावर दगडमातीचा ढिगारा आला. विठ्ठल विठ्ठल असा सूक्ष्म आवाज त्यातून ऐकू येत होता.

'विठ्ठलाने या चोखारामला, भगवद्भक्ताला, या नामपावनाला, ध्येयाने वेड्या झालेल्या या प्रापंचिकाला आपल्या पायांशी नेले, ज्ञानाला समाधीत बसवून नेले, तुकाला इंद्रायणीच्या पाण्यातून नेले, ज्ञानला समाधीत बसवून नेले, चोख्याला कुसवाच्या भाराखाली दडपून नेले ! परमेश्वरा तुझी लीला अगाध आहे !' [२२]

## रसग्रहण-

संत चोख्याची जीवन कहाणी व श्रेष्ठ असे अध्यात्म तत्वज्ञान या कथेत सांगितले आहे. पण दोहोंची कुठेही गल्लत केलेली नाही. चार वर्षांपैकी शूद्रांची अध्यात्माच्या क्षेत्रात कोंडी कशी झाली होती याचे वर्णनही केले आहे. या तत्वज्ञानाचे वर्णन करताना श्री.माटे यांची भाषा एक वेगळाच साज धारण करते.

'मी सर्वांचाच आहे ही श्रीकृष्णाची मंगल घोषणा त्रैवर्णिकांच्या जपणुकीच्या कुंद हवेत लुप्त झाली होती, धर्माच्या वाहत्या पाण्याला खांडवे पडले होते व समाजाच्या वाळूवरून वहात न राहिल्याने ते चटचटले होतेख परमेश्वराच्या भक्तीची अखिल समाजाला प्राप्त झालेली समान अधिष्ठानाची भूमी आकसुन गेली होती, निर्मल तत्वज्ञानाचे सर्वप्रभ तेज मावळल्यासारखे झाले होते, आणि मानवी जीवनाच्या विशाल संपुष्टातील आकाश आचारकांडाच्या कचऱ्याने भरून गेले होते. अशा प्रकारे धर्माच्या पंचमहाभूतांची प्रकृतीच क्षीण झालेली होती' [२३]

माट्यांचे तत्कालीन समाज परिस्थितीचे निरीक्षण अतिशय सूक्ष्म होते. त्या काळातील देवी देवता त्यांना दिले जाणारे बळी यांचे तपशीलवार वर्णन येथे केले आहे. दिंड्या पताकांचे भार, हर्षनिर्भर नृत्याची गोडी, जीविताचा गाडा, धर्मकार्य मोहरणे यासारखे शब्दप्रयोग हे या तत्वज्ञानातील चिंतनात भारदस्तपणा आणतात.

''नारायणा तुम्हाला पाहून आता सारी वासना सुटली आहे. भेदाभेद उरलेला नाही, अंतर शुध्द झाले आहे. विटाळ विटाळ असे जिकडे तिकडे ऐकू येत होते. पण नामाच्या बळाने ते जाळे तुटले आहे. देहाला विटाळ असतो असे लोक म्हणतात. पण आत्मा निर्मळच असतो. पंढरीरायाला पाहून मी-तू पण वाया गेले आहे, काम क्रोध पळून गेले आहेत. देहात असूनही मी विदेही बनले आहे.''२४ हे एका महार स्त्रीचे उद्गार आहेत की जे असामान्यत्वाचे निदर्शक आहेत. कारण ब्राह्मणांखेरीज धर्माची सूत्रे कोणाकडेच नव्हती. शूद्र व्यक्तींनी केवळ समाजाची खालच्या दर्जाची कामे करायची असा एक अलिखित नियमच होता. त्या कालखंडात चोख्या बरोबर त्याची बायको ही श्रेष्ठ अशी आध्यात्मिक प्रगती करते हे माटे यांनी आवर्जून चित्रित केले आहे.

माट्यांनी मध्ये मध्ये अभंगांचा आधार घेत अध्यात्मिक तत्वज्ञान ज्ञाना, नामदेव व चोखा यांच्या तोंडी योग्य ठिकाणी चपखलपणे बसविले आहे. चातूर्वर्ण्यव्यवस्थेचा त्यांनी निषेध केला आहे. नुकताच मिसरूड फुटू लागलेला महार पोरगा चोखा संतपदी कसा पोहचतो त्याचे दर्शन या कथेत माटे यांनी घडविले आहे.

## ८.गणू हलवाई आणि धर्मा छकडेवाला !

लेखकाला लहानपणी भेटलेल्या गणू हलवाई या माणसाचे जणू हे शब्दचित्र आहे. लेखक मोठा झाला तरी या माणसाची आठवण विसरत नाही.

**कथानक-**

गणू हलवाई हा गावात एक भला माणूस होता. त्याच्या घरावरून हे पाच सहा मित्र रोज शाळेत जात असून बग्या पोस्टमास्तर, नारायण तिरकट तारू, शाण्णव फौजदार, रघ्या रोकडे व रेणावीचा पाव्हणा असे जमून शाळेत जात असत.

नारायण कधी सरळ चालायचा नाही म्हणून त्याला तिरकटी तारू असे नाव दिले होते. फौजदाराच्या मुलाला फौजदार म्हणून, पोस्टमास्तरच्या मुलाला पोस्टमास्तर म्हटले जाई. रेणावीकडून एक नवीनच मुलगा शिकण्यासाठी येथे आला. त्याला प्रथम रेणावीचा पाव्हणा असे नाव पडले व तेच कायम झाले. रघ्या रोकडे कोष्टी होता. त्याच्या खिशात नेहमी हिरव्या पिवळ्या सुताच्या नाहीतर रेशमाच्या कांड्या असत. रेशमाने बनविलेली टोपी बग्या पोस्टमास्तर, नारायण तिरकट तारू, रघ्या रोकडे घालीत. टोपी घालायला मिळत म्हणून रघ्या नशीबवान समजला जाई. या मित्रमंडळींच्या संचाचा शाळेला जाण्या व येण्याचा रस्ता गणू हलवायाच्या दुकानासमोरून होता.

शाळेतून येण्याजाण्याच्या रस्त्यावर गणू हलवाई पासोड्यावर बत्तासे ओतीत असे. पेढे साखरेत घोळत असे. तो साखरेचे हत्ती, मोर, कोंबडे यांचे ठसे घालीत सगळी गोड कामे करीत असे. कांड्या करण्यासाठी मधूनच हातावर थुंकणे ही त्याची लकब होती. ते काहीही असो गणू हलवाई मोठा गोड माणूस होता.

गणूची बायको अंगाने जाड होती. बर्फीच्या वड्या पाडणे, बत्तासे ओतणे ही कामे मुख्यत: सारजाबाईकडेच असत. शाळकरी मुलांना ती कधी एखादा बत्तासा, एखादा पेढा देत असे. आखूड पध्दतीने नेसलेले लुगडे, सगळ्या कपाळभर कुंकवाचा मळवट असा तिचा पोशाक होता. ती नेहमी धांदलीत असे. संध्याकाळच्या वेळी दत्ताला जाण्याचा तिचा नेम कधी चुकला नाही. काही विशेष प्रसंगी सारजाबाई पुराणिकापुढे साखरेच्या वस्तू, रेघारेघांचा मोठा नारळ ठेवीत असे. नवरा बायकोचा हा जोडा सुखाने संसार करी. कधी भांडण तंटा नाही. आपला प्रपंच बरा की आपण या थाटाने ती नेहमी वागत. गावातले मिठाईचे दुकान तर चांगले चालेच पण बाजारच्या दिवशी शेपन्नास त्याला जादा मिळत. गावातील अधिकारी, श्रीमंत लोक स्वतंत्रपणे गणूची मिठाई मागवत. याखेरीज ताबूत, पालखी, कुस्त्यांचा फड, भंडारा असलेल्या ठिकाणी गणू हलवाई आपले दुकान थाटीत असे.

शहरच्या गावी किंवा सासुरवाडीला काही काम निघाले की दोहोंचा थाट बघण्यासारखा असायचा. सारजाबाई माहेरपण भोगून पंधरा दिवसांनी परत येत. आल्या की त्यांचे नेहमीचे सुतडे व गणूची पैरण वापरायला निघायची. पण बाहेरगावी कुठेही जाताना दोघे थाटात बाहेर पडत.

लहानपणीचे शिक्षण संपवून लेखक शहरात रहायला गेले. गाव सोडताना त्यांना वाईट

वाटले. सर्वजण कुठेकुठे गेले. त्यांचा जसा विरह झाला, तसा त्यांना गणू हलवाई व सारजाबाईंचाही झाला. सुमारे दहा वर्षांनी ते पुन्हा त्या गावाला गेलो. सकाळी उठून रघ्याकडे गेले. पण त्या खुजट व फिकट माणसाला जुनी मैत्री आठवेना. फौजदार तेथून केव्हाच निघून गेला होता. पोष्टमास्तरने गाव सोडले. रेणावीचा पावणा मात्र दांड, राकट केसाळ दिसणारा होता. तो भेटला. त्याने आलिंगन दिले. दोघे पुष्कळ वेळ बोलत बसले. गणू हलवायाला विसरले नाहीत. गणू बाजारला आला होता. गणूची मुले सुतडयावर बसली होती. गणू व सारजाबाई दोघांनी यांना लगेच ओळखले. त्याचे सर्व काही ठीक चालल्याचे त्याने सांगितले. त्याचा नामू नावाचा पोरगा गमावला याचे त्याला दु:ख होते.

यानंतर नऊ दहा वर्षांनी लेखक त्या गावाला पुन्हा गेले. शाळेचे सोबती नाहीसे झाले होते. रघ्या ऐन उमेदीतच मरून गेला. रेणावीचा पाव्हणासुध्दा आटपला. शेवटी ते गणूच्या घराकडे गेले. गणूने नवे घर बांधले होते. मुलांची लग्ने कार्ये झाली होती. गणू माडीच्या चांदईच्या खिडकीत उन्हाला पाठ टेकून चिलीम ओढत बसला होता. सांपत्तिक स्थितीने सुखावला तरी ओळख विसरला नव्हता. घरी गेल्यावर मुलाबाळांच्या ओळखी झाल्या. आपली एक विहीण पुण्याची असल्याचे सारजाबाईने सांगितले.

यानंतर आणखी काही वर्षांनी लेखकास सातारा जिल्ह्याच्या गावी एका यात्रेच्या ठिकाणी गणू हलवायाची गाठ पडली. घामेघुम झालेला गणू मालाची उलाढाल करीत होता. गणूच्या मोठ्या दुकानात नाना तऱ्हेचा माल होता. त्यामुळे गिऱ्हाईकांची रीघ लागली होती. दहा दिवसांची जत्रा जेवढा पैसा काढता येईल तेवढा काढला पाहिजे हा गणूचा हिशेब होता. गणू आता थकत चालला होता. त्याच्या पदरी दहा पोरे होती. त्यांच्यासाठीच ही त्याची खटपट होती. सारजाबाईच्या अंगाचीही खारीक झाली होती. मालाबद्दल कोणी काही म्हणाले तर त्या म्हणत, ''चार पैशांत तुम्हाला कुठलं चांगलं मिळलं बरं? म्हादेवाचा परसाद समजावा अन् खावावं दादा.'' या दहा दिवसात गणू भारी गडबडीत असे. दहा दिवस पैशाची सतत धार लागलेली असे. हा जत्रेचा पंधरवडा म्हणजे त्यांची सहा महिन्यांची कमाई होती. यासाठीच दोघांच्या जीवाची कासावीस चाललेली होती.

संध्याकाळी पर्यंत गणूनं असाच घाईत व्यापार केला. गिऱ्हाईकाची गर्दी संपली. घाई गडबडीत, कामाच्या वेळेत शिपायाने आणून दिलेला कागद गणूने वाचून पाहिला. त्याला कोडतात जावे लागणार होते. सगळे मिळूनच जाऊ या त्याच्या म्हणण्याला कारभारीण तयार झाली नाही. धर्माच्या छकड्याने त्याने एकटेच जाण्याचे ठरविले. महादेवाला बामण घालून पूजा बांधायला सांगायला तो विसरला नाही. 'जपून ऱ्हारं' अशी हाक देऊन गणू निघाला तो पुन्हा भेटला नाही.

## व्यक्तिचित्रे-

**गणू हलवाई-** गणू हलवाई हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. हलवा, पेढे, बर्फी, बत्तासे तयार करण्याचे काम तो करतो. शाळकरी मुलांवर त्याचे प्रेम आहे. आपल्या मुलांनीही शाळा शिकावी असे त्याला वाटते. शिक्षणाविषयी त्याला आस्था आहे. आपण बरे की आपला प्रपंच बरा या थाटाने तो वागतो. पतीपत्नींचे परस्परांवर प्रेम आहे.

सासुरवाडीला किंवा बाहेरगावी लग्नाला जाताना या दोहोंचा थाट बघण्यासारखा असे. ''जावाय मानसं'' गेली तर त्यांचा जरीकाठी रूमाल, हातात सलकडी, रेशीमकाठी उपरण्याचं नेसणं, कानात बाळी अशा झोकात गणबाची स्वारी असायची. अन् सारजाबाई तर नुसत्या लकटलेल्या असायच्या. ते मुगवं लुगडं, तो चंदेरी खण, तो भांगातला गुलाल, ती 'नत', त्या जाडजुड गोठपाटल्या ! माहेरची माणसं 'चिमाताई'च्या भोवती घोटाळत असायची. चिमाताईच्या आईला तर हिला कुठे ठेवू अन् कुठे न ठेवू असे व्हायचे.'[२५] हे जोडपे अत्यंत व्यवहारवादी आहे. खेडे गावात आपलीच पोळी पण चोरून खावी लागते हे इंगीत दोघांनीही ओळखले आहे. त्यामुळे बाहेरगावी जाताना थाटात राहणारे हे जोडपे गावाकडे आले की यांची पैरण व सरजाबाईची सुतडी लुडे बाहेर पडते.

आर्थिक परिस्थिती कितीही सुधारली तरी हा माणूसपण विसरत नाही. लहान असताना शाळेला जाणाऱ्या मी (म्हणजे श्री.म.माटे)ची म्हणजे निवेदकाची ओळख तो विसरत नाही. माट्यांच्या प्रत्येक कथेतील माणसे माणूसपणा जपतात. त्याची आर्थिक परिस्थिती पुढे सुधारते. तो माडीचे घर बांधतो. चांदईच्या खिडकीत उन्हाला पाठ देऊन चिलीम ओढीत बसण्याची, इतकी निवांतपणा अनुभवण्याची परिस्थिती येते पण त्याची कष्ट करण्याची प्रवृत्ती नष्ट होत नाही.

वयाच्या मानाने गणू थकतो. त्याच्या तोंडाचे बोळके होते. तरीही त्याची कष्ट करण्याची प्रवृत्ती कमी होत नाही. सातारा जिल्ह्यातील एका गावच्या जत्रेत तो माट्यांना भेटतो. दहा दिवसांच्या जत्रेत जेवढा पैसा काढता येईल तेवढा काढला पाहिजे हा गणूचा हिशेब. दहा पोरे असणाऱ्या या माणसाचा प्रपंचाचा पसाराही मोठा आहे. ''त्यांना बोलायला काय होतं ! मला या पोरांना काही ठिवलं तर पाहिजे !'' [२६] गणूला आयुष्यभर ही मुलांची काळजी आहे.

गणू हलवाई वृत्तीने भाविक आहे, ''देवदयेनं ब्येस हाय. आता पोरंबी जरा टनक झाल्याती. आमाला जरा हात लावत्याती. रेवनसिद्दाच्या किर्पनं समदं ठीक हाया !''[२७] सरकारी शिपायांनी आणून दिलेल्या कागदा बर हुकूम तो जेव्हा जायला निघतो तेव्हा महादेवाला ब्राह्मण जेवायला घाला. पूजा बांधा हे सांगायला तो विसरत नाही.

शेवटी गणू हलावाई एकाकी पडतो. त्याची जन्माची सोबतीण जत्रेची मौज बघण्यासाठी मागे राहते व आयुष्यभर कष्ट करणारा गणू हलवाई एकाकी पडतो. साऱ्या जन्माची दगदग सोसून गणू एकटाच जायला निघतो. त्याच्या बरोबर असणारा धर्मा छकडेवालाही एकटाच आहे. शिवाय तो मुका आहे. असे एकाकीपण त्याच्या वाट्याला येते.

सारजाबाई- हे कथेतले दुसरे पात्र. गणूची बायको सारजाबाई अंगाने स्थूल आहे. बर्फीच्या वड्या पाडणे, बत्तासे ओतणे या कामाचा मुख्य बोजा सारजाबाई निकालात काढीत असे. सरजाबाईचे बोलणे गोड आहे. नेहमी आखूड लुगडे, कुंकवाचा मळवट कपाळभर असा तिचा वेष असे. ती नेहमी धांदलीत असते. ही स्त्री वृत्तीने भाविक आहे. संध्याकाळच्या वेळी दत्ताला जाण्याचा तिचा नेम कधी चुकला नाही. सारजाबाईंचे कौतुक साऱ्या बायका करीत. काही विशेष प्रसंगी, सणासुदीला ती साखरेच्या वस्तू घेऊन पुराणिकापुढे ठेवी. एकूण या जोडप्याचे वागणे प्रपंच बरा की आपण बरे असे होते. आपल्या मुलाबाळांचे सुनांचे तिला कौतुक आहे. हौसेने सर्व गोष्टी ती कथेतील निवेदकाला सांगते. स्त्रीस्वभाव धर्माप्रमाणे ती संसारात गुरफटून जाते. शेवटी मात्र नवऱ्याला एकाकी सोडते.

याखेरीज रघ्या रोकडे, मी(निवेदक),रेणावीचा पाव्हणा इ.पात्रे येतात.

## वातावरण-

गणू हलवायाच्या आयुष्याचा कालखंडच या कथेत चीत्रीत केलेला आहे. गणू हलवाचायी तीन खणी दुघई, गणूचे नवे घर तसेच बाजार हे कथेतील वर्णन प्रसंग आहेत. प्रत्येक ठिकाणी गणू हलवाई मात्र अखंड कष्ट करताना दिसतो.

सातारा जिल्ह्यातील जत्रेचे वर्णन माटे करतात. त्यांची वर्णनाची शैली या ठिकाणी ठळकपणे नजरेस येते. 'जत्रेची गजबज विलक्षण झाली होती. दुकानांच्या रांगा सोडल्या तर जत्रेत कसलीही व्यवस्था नव्हती. तिला कसलीही मांडणी नव्हती. जत्रा बहुधा अशाच असतात. टापटीपीच्या भोक्त्या माणसांना असल्या ठिकाणी चैन पडायचे नाही. पण त्यातही एक मौज असते, जिकडे तिकडे आखीवपणा, रेखीवपणा, दोरीबंदपणा, संगतवारी, टापटीप हीही त्रासदायक असते. या गुणांच्या चाहत्या लोकांच्या हातात नेहमी शंकूसाखळी असायची ! फूटपट्टीशिवाय त्यांचे चालायचे नाही. उठल्या बसल्या त्यांच्या हाती टपदोरी हवी. त्रिकोण, चौकोन, अष्टकोन, समांतर रेषा हे त्यांच्या जीविताचे वैभव ! यांच्या बागेतील गवते नेहमी कापलेली आणि झुडपे छाटलेली असायची. झाडांखाली पाचोळा सापडायचा नाही. गवतात कवड्यांची अक्षरे काढलेली असायची. फुलझाडे रांगेने लावलेली दिसायची अन् वेलींच्या मांडवांचे 'कटिंग' केलेले असायचे. जत्रेत असला कृत्रिमपणा भेटायचा नाही.'

संवाद:-

कथेत प्रथम पुरूषी निवेदन आहे. मी हा कथेतला एक घटक आहे. मीच्या जागी माट्यांनी स्वत:ला कल्पून कथा निवेदन केले आहे. कथेतील निवेदनाची भाषा नागर तर संवाद ग्रामीण बोलीतील आहेत.

गणूला सरकारी बोलवणे आल्यावर जावे लागते. गणू सारजाबाईला म्हणतो,

''उंद्या माजं समान् हाय. कोडतात ग्येलं पायज्ये. आज समद्यानी निगावं.''

''आलं,आलं, आता समदीच चला.''

''असं कसं म्हन्तावं? आमाला जरा जत्रा बगू द्या की तुम्ही व्हा वाईच म्होरं !'' सारजाबाई म्हणली.

''असं म्हन्ता. आन् मी येकलाच जाऊ ! बरं, पण तू पोरास्नी सांभाळ. चंद्रूजी ! धर्म्याचा छकडा सांग. कारबारनी......चंद्रूपशी ठिव बरं का? मी जातुया येकला. तुमपाशी ऱ्हाऊ द्या. मातुर, महादेवाला बामन घाला ! पुंजा बांदा !''गणूने अगत्याने सांगितले.[२१]

असा गणूचा उद्‌गार त्याच्या भाविक मनाची साक्ष देतो.

वास्तविक 'गणू हलवाई व धर्मा छकडेवाला !'ही कथा म्हणता येत नाही. आपल्या संपर्कात असणाऱ्या मित्र मंडळींबरोबरच माटे या ठिकाणी गणू हलवायाची स्मृती मनात जपतात. आठवणींच्या रूपात अशी ही रचना आहे. आपल्या मुलाबाळांच्या साऱ्या हकीकती तो मनमोकळेपणाने सांगतो. लेखकाच्या मनात आपलेपणाने घर करून राहिलेल्या व्यक्तींपैकी गणू हलवाई एक होता हे स्पष्टपणे जाणवते.

## ९.माणुसकीचा गहिवर

सुभान्या नावाचा चोरट्या माणसाच्या मनात माणुसकीचा झरा जिवंत आहे हे माट्यांनी या कथेच्या आधारे दाखवून दिले आहे. माट्यांच्या कथेत 'चांगुलपणा' हा जणू माणसाचा स्थायीभावच आहे.

### कथानक-

खटल्याचा निकाल लागला होता. सुभान्या सुटला. पण त्याच्या साथीदारांना पाच वर्षांची

सक्त मजुरी झाली. शिद्या, बापू, चंडीराम व संतू कारागृहाची वाट चालू लागले. सुभान्या मात्र साथीदारांकडे उदासपणे पहात उभा होता.

सूरजमल मारवाडी गावाची प्रतिष्ठित आसामी होती. चारचौघात त्याला मान होता. कोणाचे काहीही काम निघो शेठजीची मदत झाली नाही असे होत नसे.

चंडीराम मध्यम वयाचा गृहस्थ, अंगाने चांगला दणकट होता. सदैव गांजा मळणाऱ्या या माणसाला गांजाचा कैफ सतत चढलेला असे. त्याच्या स्वभावाला एक तऱ्हेची बेफिकीरी आली होती. संतू थोडा वयस्क असला तरी शरीरयष्टी राखून होता. संतूला त्याच्या बापानं एकदा बामनाच्या घरी नेऊन ठेवलं. बामन चांगला माणूस होता. बामणीण त्याला पळसाच्या पानावानी दोन भाकरी देत असे. ते सोडून तो आठ पंधरा दिवसांनी मावळणीकडे जातो. तिथं गुरं राखल्याशिवाय जेवायला मिळत नसे. तिथून कंटाळून येतो. ते गवंड्याच्या हाताखाली कामाला राहतो. बापू हा एक शेलाटा आसामी होता. चेहऱ्यावरून हा माणूस अबोल व बावळा वाटे. पण बोलला म्हणजे भारी भेदक बोले. तो असाच लाकडे फोडायला जायचा. एकसारखी लाकडे फोडून छातीत दुखायला लागले पण मालकाने गय केली नाही. म्हणून तो मालकावर दगड घेऊन धावला. बापूच्या बायकोची व याची वर्षात कधीच गाठ पडत नाही. शिदू हा रंगेल माणूस आहे. तंबाखूची फक्की मारायची त्याला सवय आहे. शिदूला जागा, जमीन, बायको आहे पण याला ते सोडून अवदसा आठवते. सुभान्या तोतरा असल्याने फारसा बोलत नसे. चौघे पाच जण मिळून सूरजमलच्या घरी डाका घालायचे ठरवतात.

सुरजमलचे घर आज सुन्न होऊन गेले होते. त्याला त्या चोरट्यांनी मारले. ज्या स्त्रियांचे मुख काय पण नखसुध्दा चोरट्यांनी कधी पाहिले नाही अशा सुरजमलच्या घरातील स्त्रियांना चोरट्यांनी हिसका हिसकी करून त्यांचे दागिने काढून घेतले. सुरजमलच्या जीवाची अखंड चरफड होऊ लागली. याचा पाढा प्रत्येका समोर वाचायचा म्हणजे त्याला वाईट वाटू लागले.

सरकारी अधिकारी आले. गेलेल्या जिनसांची मोजदाद केली. सर्व बारीक सारीक गोष्टींची शेटजींबरोबर फौजदारांनी चिकीत्सा केली. फौजदारांनी तपास लावला. शिकस्त करून पाच माणसे पकडली. महिनाभर तुरुंगातून कोडतात व कोडतातून तुरुंगाकडे अशा त्यांच्या वाऱ्या होत्या. त्यांना दोन दोन चार चार वर्षाच्या शिक्षा झाल्या. या पाचांपैकी सुभान्या मात्र सुटला. चंडिराम, संतू, बापू अन् शिदू यांना हातकड्या घातल्या. अन् त्यांच्या दंडांना काढण्या बांधल्या. या गुन्हेगारांची रवानगी तुरूंगाकडे झाली.

शेटजींच्या साक्षीवरून सुभान्याला सोडण्यात आले. आपल्या घरी चोरी करण्यास पहिले चौघेच आले. सुभान्या आपल्या घरी आला नव्हता. हे त्यांनी निक्षून सांगितले. शेटजीची साक्ष प्रमाण मानून न्यायाधिशांनी त्याला सोडून दिले.

कोर्ट खोलीत गेल्यानंतर न्यायाधिशांनी सुरजमल शेटजींना बोलावणे पाठविले. चोरी करणाऱ्या मंडळीत सुभान्या नव्हता ते कोडे काय आहे? असे सुरजमल शेठजींनी का सांगितले ? हे त्यांनी विचारले. त्यांनी डोळ्यात पाणी आणून सांगण्यास सुरवात केली. त्यांनी पत्नीच्या हातातील वस्तू हिसकल्या. मेहूणीला ही त्यांनी तसेच केले. शेटजींची सलकडी त्यांनी हिसकून घेतली. मुलीच्या पायातील शिंदेशाही साखळ्या जेव्हा निघेनात तेव्हा त्यांनी तिचे पाय तोडण्याची भाषा चालविली. सुभान्या मध्ये पडला. माझा वाटा मला देऊ नका असे म्हणत तो मुलीच्या पायावर पडला. त्याच्याकडे खरी माणूसकी आहे म्हणून शेटजींनी तशी साक्ष दिली.

शेवटी शेटजींनी त्याला घरी कामाला ठेवून घेतले.

## व्यक्तिचित्रे-

**सुरजमल-** ही या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा. गावातील ही एक प्रतिष्ठित आसामी होती. सुरजमल निर्व्यसनी होता. गावातील भल्या माणसांच्यात त्याची गणना होई. कुठल्याही सार्वजनिक कामासाठी शेठजी मदत करीत असे.

सुरजमलच्या घरी जेव्हा चोरी होते त्या चोरी झालेल्या वस्तूंपेक्षाही बायको व मेहूणीच्या अंगाला चोरांनी हात लावला याचे त्याला जास्त वाईट वाटते. " आपण कुणाचे काय खाल्ले होते? कुणाचे गहाण डुबवले नव्हते, कुणाचे शेत घशाखाली घातले नव्हते, कुणाच्या स्त्रीकडे कधी वाकड्या नजरेने पाहिले नव्हते. आपल्याला यांनी का मारावे आणि लुटावे? व्याजबट्टा सचोटीने करायला कुणाची चोरी आहे? दुकान चालवायला कुणाची हरकत आहे?" [३०] असे त्याच्या मनात येते. तो वृत्तीने सत्शील व सचोटीने व्यवहार करणारा आहे.

आपल्या मुलीला सुभान्याने वाचविले. चोरीचा आपला वाटा त्यागूनसुध्दा तो माणूसकीला जागला. म्हणून शेटजी तो चोरट्या माणसात नव्हता अशी साक्ष देतात. न्यायाधिशासमोर शेटजी ढसाढसा रडतात. "-साहेब, सुभान्या चोर खरा; पण जातीचा माणूस आहे. त्यानं माझं मुल वाचविलं, त्यानं तिला दुसरा जन्म दिला ! आता मला सांगा हा माणूस तिथं होता असं मी कसं सांगू ! मला काही माणूसकी आहे की नाही? तो असेल चोरांच्या संगतीत, पण तो माणूसकीला अंतरलेला नाही. परमेश्वर त्याला सुखी ठेवो." [३१]

शेवटी सुभान्याला तो आपल्या घरी ठेवीरेवीच्या कामावर ठेवून घेतो.

माटव्यांच्या कथेतील माणसे श्रीमंत असोत की गरीब, माणूसकीला जागतात. तोच त्यांचा श्रेष्ठ गुण होय.

**सुभान्या-** सुभान्या हे या कथेतील दुसरे महत्वाचे पात्र. सुभान्या तोतरा आहे.

प्रथम जिभेला दहा पाच हिसके द्यावेत तेव्हा त्याच्या तोंडाची फटफटी चालू होत असे. हा मनुष्य कमरेपासून खाली ठेंगना आहे. याच्या दंडाचे कांडे कोपरापासूनच्या हाताच्या मानाने आखूड आहेत.

हा चोर जरूर आहे. पण माणुसकीचा, वात्सल्याचा झरा या माणसात जिवंत आहे. लहान मुलीचे पाय तोडून मिळणारे पैसे याला नको आहेत. आपल्या वाट्याचे पैसे नाकारून तो मुलीचे पाय तोडण्यास मज्जाव करतो. इतरांनाही तो परोपरीने विनवून सांगतो. शेवटी तो सांगतो, ''माजा वाटा मला द्येवू नगा, तुमीच समदं घ्या, पण ह्यो कवळा जीव ! अरं तुमाला लेकरं न्हाईती का रं?'' [३२] कोणी ऐकत नाहीसे पाहून तो पोरीच्या पायावर पालथा पडून मुलीचे प्राण वाचवितो. न्यायाधिशदेखील याची पाठ थोपटतो. खरा माणूसकीचा गहिवर या माणसाकडे आहे. हा चोरी करणारा जरूर आहे पण हृदयात माणुसकीचा वात्सल्याचा झरा जिवंत ठेवणारा आहे.

## वातावरण-

कथेत दोन पध्दतीचे वातावरण व माणसे चीत्रीत केली आहेत. माणसे चोरी करणारी आहेत. गरीब आहेत. कुणी गांजा ओढतो, कुणी बेफिकीर आहे, चंगीभंगी आहेत. पाच जणांना काहीना काही सवयी आहेत. ही वेगवेगळ्या कुटुंबातून आली आहेत.

तर शेटजीच्या घरी सर्व ऐश्वर्य आहे. घरी गडीमाणसे आहेत. त्यांना देखील शेटजीकडून माणुसकीची वागणूक मिळते.

या श्रीमंती-गरीबीचा सांधा जुळतो तो सुभान्याच्या रूपाने !

## संवाद-

या कथेतील संवाद ग्रामीण भाषेत तर निवेदन नागर भाषेत आहे. ''माजा वाटा मला द्येवू नगा, तुमीच समदं घ्या, पन ह्यो कवळा जीव ! अरं तुमाला लेकरं न्हाईती का रं?'' शेवटी ते ऐकत नाहीत असं पाहून तो तोतरा तो तो करीत तानीच्या पायावर पालथा पडला ! शेटजी ढसाढसा रडू लागले. ''-साहेब, सुभान्या चोर खरा; पण जातीचा माणूस आहे. त्यानं माझं मुल वाचविलं. त्यानं माझं मुल वाचविलं, त्यानं तिला दुसरा जन्म दिला ! आता मला सांगा हा माणूस तिथं होता असं मी कसं सांगू ! मला काही माणूसकी आहे की नाही? तो असेल चोरांच्या संगतीत, पण तो माणूसकीला अंतरलेला नाही. परमेश्वर त्याला सुखी ठेवो.'' [३२]

हे या कथेतील सुभान्या व शेटजीचे उद्‌गार दोहोंच्याही अंगी असणाऱ्या माणूसपणाची साक्ष देतात.

ही कथा बांधणीच्या दृष्टीने सैल व पसरट वाटते. लेखकाचे सुरवातीचे येणारे पुष्कळसे कथाबाह्य निवेदन कथेच्या परिणामाच्या दृष्टीने बाधक आहे.

## १०.शेवंतीचा खराटा

हे एका झाडूवाल्या शेवंती नावाच्या स्त्रीचे शब्दचित्र आहे.

आपली अवघी हयात या बाईने खराटा फिरविण्यात घालविली. 'पदुर आला त्येवा धरनं' म्हणजे तेरा चौदा वर्षाची असल्यापासून ती हे काम करते. आज ती साठीच्या आसपास आहे. तिला नीट दिसत नाही. तोंडात दात नाहीत. आज ती साठीच्या आसपास आहे. वृध्दपणामुळे सर्वांगावर सुरकुत्या पडल्या आहेत. मनाने ती खिन्न आहे. लेकानं एकदा मुठभर माती द्यावी असे तिला वाटते. 'नवरा कवाच मरून गेला, थोरला ल्योक चार प्वारं ठिवून निगून गेला, सुनेनं पोरं माज्या पदरात टाकली अन ती बी एका बाबा बरूबर निगून गेली, धाकटा ल्योक उलीसा बरा हाइ, ल्येकी समद्या उलातल्या, सून साळा झाडती, प्वारं सडकनी हिंडत्यात', हा या स्त्रीच्या प्रपंचाचा हिशेब आहे. [३३]

चाळीस पंचेचाळीस वर्षे खराटा तिच्या प्रपंचात कायम आहे. तोच तिच्या जीविताची राखण करीत उभा आहे. हातफाय थकलेली ही स्त्री आता मूठभर मातीची वाट पहात आहे. तिचे पहिले नाव शेवंती. सासरा तिला 'ऱ्हाइ' म्हणू लागला. ऱ्हाई म्हणजे राधा व शेवंती म्हणजे फुलेरी झुडूप. पण शेवंतीच्या बाबतीत तिचा व्यवसाय पाहिला तर दोहोंचे विडंबन झाले आहे. नवऱ्याची संगती लाभली पण प्रेम लाभले नाही याचे तिला वाईट वाटते. साऱ्या जन्मात तिला सुख कुठेच लाभत नाही.

निवेदक शाळेत शिकवायला जायचा, कोणाचे बरे वाईट पहायचा. त्यामुळे राही सुखदु:खाच्या गोष्टी त्यांना सांगत असे. वय होऊ लागले तसे उभ्याने झाडण्याचे कष्ट तिला होईनात. एकदा काम सुरू झाले की ती सर्वांना सारखेच लेखते. पदवी, श्रीमंती याची तिच्या दृष्टीने किंमत शुन्य आहे. निवेदक येताना दिसला की त्याच्या शिक्षणाची किंमत समजून ती त्यांना मनोभावे नमस्कार करीत असे. हा माणूस वस्तीत येऊन लोकांना हवं नको ते विचारतो, प्रसंग पडला तर औषधपाणी करतो हे तिने पाहिलेले आहे. त्यामुळे तिच्या मनातही माणूसकी जागी राहते.

जे एकदोन रस्ते ती स्वच्छ ठेवते. त्या रस्त्यातील प्रत्येक घरातून ती सणासुदीला वाढणे मागते. किंबहुना तो आपला हक्क आहे असे ती समजते. पगाराव्यतिरीक्त तिची प्राप्ती ती एवढीच. तिला चहा आवडतो हे ती मनमोकळेपणाने लेखकाजवळ व्यक्त करते. लेखक तिला एक रूपाया

देतो.

## रसग्रहण-

हे एक शब्दचित्र आहे. ही स्त्री एकाकी आहे. आपल्या जीवीताला ती कंटाळलेली आहे. 'पदुर' आला तेव्हापासून खराटा तिच्या जन्माला लागलेला आहे. शिक्षणाबद्दल तिला आस्था आहे. जन्मात सुखाचा विसावा तिला कुठे मिळाला तरी आपला खराटा थांबवून ती माट्यांना मनोभावे नमस्कार करते. शब्दचित्र रेखाटताना देखील माटे मध्ये मध्ये आपले विचार व्यक्त करताना आढळतात. ती जेव्हा मनोभावे त्यांना नमस्कार करते तेव्हा गरिबांकडून मिळणारा हा मान त्यांना राजाला मिळणाऱ्या मानाप्रमाणे वाटतो. ही कामे स्त्रियांनाच पडतात याचे त्यांना दु:ख वाटते.

शब्दचित्र रेखाटताना माट्यांनी लिहिलेली ही वाक्ये शेवंतीचे शब्दचित्र थोडक्या शब्दात पण अधिक ठळक करण्यास मदत करतात.

'हेमंताचा पाचोळा, वसंताचा धुरोळा आणि वर्षाचा चिखल या सर्वांवर राहीपाशी एकच तोडगा होता आणि तो म्हणजे तिचा तो खराटा!' [३४]

किंवा

'पण राहीने श्रीमंताला मान दिला नाही, पदवी तिला कळली नाही, आणि सोवळ्याची बूज तिने राखली नाही तरी ममत्व, सहानुभूती आणि कृतज्ञता यांना ती पारखी झाली नव्हती.'३४

राहीला उद्देशून माटे जे उद्गार काढतात ते आजच्या काळात खरे झालेले आपल्याला पहायला मिळतात. काळ व त्या माणसांचेच प्रयत्न त्यांना अनुकुल झालेले आहेत. शिक्षणाचा संस्कार होऊन ही माणसे स्वाभिमानी झाली आहेत. तिला उद्देशून माटे म्हणतात, ''राही ! तुझे नाव शेवंती, पण पासष्ट वर्षे या जगात आणि समाजात जगून तुझा शुध्द खराटा होऊन गेला, तुला कसलेही सुख लागले नाही. तुझ्या काळात या चुकीची दुरूस्ती कोणालाही करता येण्यासारखी नाही. पण तू गेलीस तरी तुझी ही गटारापाशी लोळणारी नातवंडे खरोखरच जागची उठतीलच; ती माना वर करून चालू लागतील. ती आक्रोश करतील. स्वाभिमानाचे कडकडीत शब्द ती बोलू लागतील. काळाचा ओघ आणि स्वकीयांचे प्रयत्न तुझ्या लेकरांना अनुकूल आहेत. तुझी लेकरे समाजावर चवताळून उठतील. पण समाज जाब देतो असे दिसते !सहस्त्रावधी वर्षांचे हे दुखणे दोन पिढ्यांच्या अवकाशात उताराला लागले आहे. हे पाहून जीव हर्षभरित होतो, आणि थक्क ही होतो. जे सुग्रास अन्न तुला मिळाले नाही ते तुझे नातू खचितच खातील, जे वस्त्र तुला कधी लेता आले नाही ते तुझ्या नाती अंगावर घालून खचित मलपतील, आणि ज्या उंच हवेल्यांच्या

दारापुढचा केर काढण्यापुरतीच तू त्यांच्या आसपास जात होतीस त्यात राहण्याचे भाग्य तुझ्या नातवंडांना खचित लाभेल.''[३५]

माट्यांची ही भविष्यवाणी आज खरी झालेली आहे.

## ११.अजान वृक्षाच्या सावलीत

इंद्रायणी नदीच्या काठचा प्रदेश अनेक कारणांनी समृध्द आहे. पारमार्थिक लोकशाही समृध्द करणारी सर्व संतमंडळी नामा, सावता, सेना, गोरा, दासी जनी ज्ञानदेवांनी समाधी घेतली तेव्हा जमा झाली होती. ज्ञानदेवांच्या समाधीनंतर इंद्रायणीचे पावित्र्य सहस्त्रपटींनी वाढले. अशा पवित्र स्थळी माट्यांना एकदा का असेना जावेसे वाटते. ज्ञानदेवांसारखा रसिक तत्वज्ञानी तेथे समाधी लावून बसल्याने माट्यांच्या मनात आत्मभाव निर्माण होतो. माणसाच्या जातीच्या समान भूमिकेवर माट्यांना ज्ञानदेव जवळचा वाटतो.

अजानवृक्षाखाली थोडा वेळ तरी समाधानाने बसावे असे माट्यांना वाटते. ज्ञानदेवांच्या दारातला पिंपळ सोन्याचा आहे असे म्हणतात. पण खराच सोन्याचा असता तर ज्ञानदेवांचा प्रसाद म्हणून भक्तांनी तो नेऊन त्याला एकही पान शिल्लक राहिले नसते. 'आधी बसविली पंढरी मग वैकुंठ नगरी' या नामदेवांच्या अतिशयोक्तीचे मर्म करणाऱ्याला आणि ऐकणाऱ्यालाही कळते तसेच सोन्याच्या पिंपळाचे आहे.

ज्ञानदेवांची समाधी अवस्था ज्यांनी पाहिली असेल त्यांना काय वाटले असेल याची कल्पना माटे येथे करतात. त्यासाठी 'हृदयाचा कंद उन्मळून पडले' असा शब्दप्रयोग माटे करतात. काही ढसाढसा रडू लागले. ज्ञानदेवांचा वडिल भाऊ निवृत्ती हा तर 'संकोचला संसार। पारूषला व्यवहार।' या मनस्थितीला जाऊन पोहचला होता. तोही लहान मुलासारखा रडू लागला. मुक्ताई तर लहानच होती. तिचे ही मन उद्वेगाने भरून गेले. इतका करूणास्पद देखावा महाराष्ट्राच्या इतिहासात कुठेही नसेल.

ज्ञानेश्वरांच्या लहानपणी जर आपण असतो तर त्यांना आपण कोरान्न आणून दिले असते. मुक्ताईला खेळवले असते. ज्ञानदेवांचे वेदांतावरील भाष्यही लिहून घेतले असते. रेड्याचे वळ ज्ञानदेवांच्या पाठीवर उठले असे सांगत ज्ञानदेवांचे सर्वव्यापी ममत्व सगळीकडे सांगत हिंडलो असतो असे माट्यांना वाटते. ज्ञानदेवांनी लावलेल्या कैवल्याच्या वेलाला विस्तारून जेव्हा फुले आली तेव्हा लोक ''मोगरा फुलला फुले वेचायला चला'' असे ओरडून सांगू लागले त्या भाग्यवंत लोकात आपण असतो तर फार बरे झाले असते. एकूण ज्ञानदेवांचा सहवास आपल्याला लाभता

तर आपण भाग्यवंत ठरलो असतो असा विचार माटे इथे व्यस्त करतात.

माणसाची जात प्रगल्भ होत चालली आहे. पूर्वीच्या माणसांपेक्षा ही बुध्दिमान आहेत. काही वेळा मागच्या माणसांची गणतीही आत्ताच्या लोकांत नसते. पण अशी काही माणसे असतात की पुढील विस्ताराला कारण होतात. त्यांच्या बुध्दीची व कतृत्वाची झेपही मोठी असते. त्यांचे स्मरण करणे जीवन सामरस्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

कोट्यावधी लोक गवताच्या पात्याप्रमाणे जन्मतात अन् मरतात. पण ज्यांनी बुध्दीने, कतृत्वाने काही नवीन करून दाखविलेले असते व मानवी जीविताला वैभव प्राप्त करून दिलेले असते त्यांच्याकडे माट्यांचे मन वारंवार धावते. माट्यांनी ही ऐतिहासिक रसिकता जपली आहे. ही रसिकता दाखविणे हे सर्वसामान्यांच्या वाढीच्या दृष्टीने इष्ट आहे. हा मोह संत एकनाथांना देखील पडला. माटे त्यांचा उल्लेख 'पैठणचा उदारधी ब्राह्मण' असा करतात. त्याने ज्ञानदेवांच्या गळ्याला लागलेली अजान वृक्षाची मुळी काढली. भूतकाळात अडून राहिलेली ज्ञानगंगा घरोघरी पोहचावी म्हणून नाथांनी ज्ञानेश्वरीची पाठशुध्द प्रत बनविली. त्या आईचे म्हणजेच ज्ञानेश्वरीचे पारायण आज घरोघरी सुरू आहे. शिक्षक, विद्वान, विद्यार्थी या सर्वांना ज्ञानदेवांच्या वाङ्मयाचा मोह आहे.

एवढ्या लहान वयात ज्ञानदेवांनी विचारांची एवढी नानाविध क्षेत्रे कशी उल्लंघिली याचे लेखकाला आश्चर्य वाटते. भक्तीची भक्तीमार्गीयांची परंपरा व ज्ञानदेवांची वेदांत वाणी यांचा परस्परसंबंध असावा. ''कुंचे पताका झळकती, टाळ मृंदग वाजती !'' हा भक्तीमार्गीयांचा प्रेमळ घोष एकीकडे तर ''अवघ्या बाही म्या व्योम कवळिले हे दोन्ही एकाच वेळी ज्ञानाच्या मनात चालू होते काय? असा प्रश्न लेखकाला पडतो. चंद्रभागेच्या तीरावर टाळमृदंगाचा घोष चालू असताना ''माझा मीच श्रोता, माझा मीच वक्ता, माझा मीच दाता त्रिभुवनी'' असे ज्ञाना मनाशी म्हणत होता. असे जर वेदांत व भक्तीमार्ग यांचा संबंध आहे तर सर्वसामान्य लोकांनी याचे चिंतन करीत राहणे प्राप्त आहे.

आम्हा चारचौघांचा मार्ग आहे तो मुंगीचा आहे. ज्ञानदेवांचा ज्ञानमार्ग हा विहंगामाचा आहे. मनाची परिभ्रमण गती देखील गरूडाला लाजवील अशी आहे. आजच्या काळी आपली बुध्दी चालवून माणसाने प्रापंचिक हाल कमी करून घेतले आहेत. प्रपंचातून परमार्थाकडे वळण्याऐवजी प्रपंच ही अंगी लागणारी व भोग्य वस्तू आहे असे सर्व सामान्य माणसाला वाटू लागले आहे. म्हणजेच प्रपंचावर रागावून किंवा तो निरस वाटून परमेश्वराच्या मंदिराची वाट चालू लागावे असे कोणास वाटणारच नाही काय? अशी शंका लेखकाच्या मनात येऊन जाते.

आजचा माणूस हा अधिकाधिक सुखी व जिज्ञासू बनत चालला आहे. म्हणून परमेश्वराची भक्ती करणे असे स्वरूप न राहता शास्त्रांच्याही पलीकडे असलेल्या परमेश्वराचे संशोधन करणे हा

एक अभ्यास विषय बनेल. हे संशोधन ज्याच्याने करवेल तो करेल त्यामुळे व परमेश्वर भक्तीशिवाय संसार सुखाचा होत चालल्याने माणसे भक्तीकडे वळणारही नाहीत. वस्तू व भोवतालचा पसारा ही प्रकृतीत:च दु:खमूल आहे. या प्रापंचिक गोष्टीबद्दल असणाऱ्या कल्पनाच आता बदलाव्या लागतील. 'येणे दु:खे माझा फुटो पाहे प्राण' ही तुकारामाची कल्पनाही आता कोणाला कळणार नाही. पण सर्व वस्तुजाजातीच्या ठिकाणी असलेले सनातन, शाश्वत तत्व असेल त्यासाठी आजचा माणूस शुध्द जिज्ञासा म्हणून प्रवृत्त होईल.

या विचारात पाखंड भरले आहे असे ज्ञानदेवांना वाटेल. पण या ज्ञानशीलांच्या मुकुटमण्यापुढे आपल्या मनातील विकल्पही माटे इथे मनमोकळेपणाने सांगतात. ज्ञानदेव त्यांना मानव्याचा एक प्रचंड प्रतिनिधी वाटतो. मानवी मनाचे सर्व अनुभव त्याच्या या चरित्रात मिळतील इतके ज्ञानदेवांचे चरित्र प्रगल्भ आहे.

माणसाला भुरळ पाडणारे सगळे प्रश्न ज्ञानाला पडले. त्यांनी ते सर्व सोडवून जीविताच्या धर्मशाळेतून आपली सुटका करून घेतली व जिवंत समाधी घेऊन सर्व काही आटोपल्याचे जाहीर केले. मानवी जीवनातून ज्ञाना सुखासमाधानाने बाहेर पडला. माट्यांना वाटते 'तुझी ती पारमार्थिक लोकशाही केवढी संपन्न आणि प्रसन्न होती ! आम्ही त्या लोकशाहीत प्रविष्टही झालेलो नाही. पण मनाने केव्हा तुझ्या दाराशी यावे आणि तिने पावन केलेल्या त्या पिंपळाचा वारा घ्यावा असे मधून मधून वाटते.'[३६]

'अजान वृक्षाच्या सावलीत' या वैचारिक निबंधात माटे ज्ञानदेवांविषयी कृतज्ञता व्यक्त करतात. सर्वसामान्य माणसाची आज भक्तीमार्गाविषयीची कल्पना, वेदांत व भक्तीमार्ग यांच्या अभेद्यत्वाची कल्पना माट्यांनी अगदी मोजक्या व समर्पक शब्दात वर्णन केली आहे. माट्यांचे चिंतनशील व्यक्तित्व या निबंधातून व्यक्त होते. त्या काळात पारमार्थिक लोकशाही निर्माण करणाऱ्या संतांविषयी माट्यांना आदर आहे, त्यांच्यावर त्यांची श्रध्दा आहे. ज्यांनी आपल्या बुध्दी वैभवाने किंवा कतृत्वाने मानव जातीला वैभव प्राप्त करून दिले. त्यांच्याकडे माट्यांचे मन पुन:पुन्हा ओढ घेते.

-----

# संदर्भ


१) माटे श्री.म.:माणुसकीचा गहिवर.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
सातवी आवृत्ती १९७८. पृष्ठ क्रमांक ९.

२) तत्रैव पृष्ठ क्रमांक १४.

३) तत्रैव पृष्ठ क्रमांक १२.

४) तत्रैव पृष्ठ क्रमांक १६.

५) तत्रैव पृष्ठ क्रमांक ४.

६) तत्रैव पृष्ठ क्रमांक २.

७) तत्रैव पृष्ठ क्रमांक ५.

८) तत्रैव पृष्ठ क्रमांक १५.

९) तत्रैव पृष्ठ क्रमांक १७.

१०) तत्रैव पृष्ठ क्रमांक २७.

११) तत्रैव पृष्ठ क्रमांक २९-३०.

१२) तत्रैव पृष्ठ क्रमांक ३६.

१३) तत्रैव पृष्ठ क्रमांक ४८.

१४) तत्रैव पृष्ठ क्रमांक ४४.

१५) तत्रैव पृष्ठ क्रमांक ५१.

१६) तत्रैव पृष्ठ क्रमांक ५६.

१७) तत्रैव पृष्ठ क्रमांक ६०.

१८) तत्रैव पृष्ठ क्रमांक ८०.

१९) तत्रैव पृष्ठ क्रमांक ६३-६४.

२०) तत्रैव पृष्ठ क्रमांक ७६.

२१) तत्रैव पृष्ठ क्रमांक ८७.

२२) तत्रैव पृष्ठ क्रमांक १०५.

२३) तत्रैव पृष्ठ क्रमांक ८१.

२४) तत्रैव पृष्ठ क्रमांक ९४.

१५) तत्रैव पृष्ठ क्रमांक १०९-११०.

२६) तत्रैव पृष्ठ क्रमांक ११५.

२७) तत्रैव पृष्ठ क्रमांक ११२.

२८) तत्रैव पृष्ठ क्रमांक ११४.

२९) तत्रैव पृष्ठ क्रमांक ११६-११७.

३०) तत्रैव पृष्ठ क्रमांक १२५.

३१) तत्रैव पृष्ठ क्रमांक १३०.

३२) तत्रैव पृष्ठ क्रमांक १२९-१३०.
३३) तत्रैव पृष्ठ क्रमांक १३२.
३४) तत्रैव पृष्ठ क्रमांक १३४.
३५) तत्रैव पृष्ठ क्रमांक १३७-१३८.
३६) तत्रैव पृष्ठ क्रमांक १४९.

-----